पुणे, शनिवार, ८ मार्च २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 101 • वर्ष ४ थे, अंक १०१ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News

जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा



रंगारी रॉयल्स, नादब्रह्म सर्ववादक संघांची विजयी कामगिरी

१२

# राज्याचा आर्थिक पाहणी सर्वेक्षण अहवाल सादर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने शुक्रवारी विधिमंडळाच्या पटलावर आर्थिक पाहणी सर्वेक्षण अहवाल सादर केला. त्यात राज्याचा विकासदर व महत्त्वाच्या योजनांची महत्त्वपूर्ण आकडेवारी मांडण्यात आली आहे. 'आमदनी अठन्नी खर्चा रुपय्या', या म्हणीप्रमाणे राज्य सरकारचे कामकाज सुरु आहे. यामुळे राज्यासमोर आर्थिक संकट वाढले आहे.

महसुली उत्पन्नापेक्षा राज्याचा खर्च जास्त होत आहे. कर्ज आणि व्याजापोटी मोठी रक्कम खर्च होत आहे. यामुळे भांडवली खर्चासाठी दुसरे कर्ज काढण्याशिवाय पर्याय नाही, असा राज्याची गंभीर आर्थिक परिस्थिती मांडण्यात आली आहे. आर्थिक पाहणी सर्वेक्षण अहवालातून राज्याची बिकट परिस्थिती समोर आली आहे. उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांच्याकडून विधिमंडळात हा अहवाल मांडण्यात आला. त्यानुसार, त्यात २०२४-२५ साठी वित्तीय तूट २.४ टक्के तर महसुली तूट ०.४ टक्के इतकी अंदाजित करण्यात आली आहे. तर भांडवली उत्पन्नाचा वाटा २४.१ टक्के तर भांडवली खर्चाचा हिस्सा २२.४ टक्के

» पान ५ वर

### काय आहे आर्थिक सर्वेक्षण अहवालात?

- २०२४-२५ साठी राज्याची महसुली जमा ४ लाख ९९ हजार ४६३ कोटी रुपये अपेक्षित तर महसुली खर्च ५ लाख १९ हजार ५१४ कोटी अपेक्षित
- कर, महसूल आणि करेतर महसूल (केंद्रीय अनुदानासह) अनुक्रमे ४ लाख १९ हजार ९७२ कोटी आणि ७९ हजार ४९१ कोटी अपेक्षित
- २०२४-२५ मध्ये जानेवारी पर्यंत प्रत्यक्ष महसुली जमा ३ लाख ८१ हजार ८० कोटी रुपये ही रक्कम अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ७६.३ टक्के आहे.
- अर्थसंकल्पीय अंदाजानुसार २०२४-२५ करिता राज्याचा महसुली खर्च ५ लाख १९ हजार ५१४ कोटी अपेक्षित आहे.
- स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत कर्ज आणि व्याजापोटी १७.३ टक्के रक्कम खर्च होत आहे.
- सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार राजकोषीय तूट २.४ टक्के, महसुली तुट ०.४ टक्के असणार आहे.
- २०२४-२५ करिता राज्याचा प्राधान्य क्षेत्रासाठीचा वार्षिक कर्ज आराखडा ७ लाख २५ हजार कोटी रुपये असणार आहे. त्यामध्ये कृषी क्षेत्राचा हिस्सा २४.४ टक्के आणि 'सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग' क्षेत्राचा हिस्सा ६०.७ टक्के आहे.

### लागवड क्षेत्रात प्रचंड घट

- राज्यातील २०३ तालुक्यांमध्ये अतिरिक्त, ६८ तालुक्यांमध्ये सरासरी आणि ८४ तालुक्यांमध्ये अपुरा पाऊस पडला आहे. कृषी गणनेनुसार लागवड क्षेत्रात प्रचंड घट झाली. १९७०-७१ नुसार राज्यातील सरासरी लागवड क्षेत्र ४.२८ हेक्टर होती. २०२१-२२मध्ये सरासरी लागवड १.२३ हेक्टर राहिली आहे. सन २०२४-२५ च्या खरीप हंगामामध्ये १५७.५९ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली. २०२४-२५ च्या रब्बी हंगामामध्ये ६२.८१ लाख हेक्टर क्षेत्रांवर पेरणी पूर्ण झाली आहे.

## At a Glance

### भारतीय हवाई दलाचे जग्वार कोसळले



**नवी दिल्ली :** अंबालाजवळ भारतीय हवाई दलाचे जग्वार लढाऊ विमान कोसळले. दिलासादायक बाब म्हणजे वैमानिक वेळीच सुखरूप बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली. विमान नियमित प्रशिक्षण उड्डाणावर असताना ही घटना घडली. माध्यमातील वृत्तानुसार, भारतीय हवाई दलाने एक निवेदन जारी करून म्हटले आहे की, वैमानिकाने शहाणपणा दाखवला आणि विमान लोकवस्तीच्या भागातून दूर नेले आणि सुरक्षितपणे बाहेर काढले. त्यामुळे जमिनीवर जीवित किंवा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही. अपघाताचे कारण शोधण्यासाठी भारतीय हवाई दलाने चौकशीचे आदेश दिले आहेत. तांत्रिक बिघाड झाला की अन्य काही कारणामुळे हा अपघात झाला, याचा शोध घेतला जात आहे.

# महाराष्ट्र अव्वलच

## १० वर्षांत परकीय गुंतवणुकीचा विक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** गेल्या दहा वर्षातील विक्रमी परकीय गुंतवणूक केवळ ९ महिन्यात महाराष्ट्रात आली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. यासाठी त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राचे अभिनंदन केले आहे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याविषयी बोलताना म्हणाले, महायुती सरकारने आपलाच २०१६-१७ या आर्थिक वर्षाचा विक्रम मोडला आहे. विशेष म्हणजे चालू आर्थिक वर्ष पूर्ण होण्यासाठी आणखी एक तिमाही बाकी आहे. त्या आधीच महाराष्ट्रामध्ये विक्रमी गुंतवणूक आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि मंत्रिमंडळाच्या नेतृत्वात महाराष्ट्राची घोडदौड अशीच सुरू राहील असा विश्वास

» पान ५ वर



"२०२४-२०२५ या आर्थिक वर्षातील पहिल्या ९ महिन्यात आतापर्यंत एकूण १,३९,४३४ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक आली आहे. ही गेल्या १० वर्षांत महाराष्ट्रात कोणत्याही एका वर्षात आलेल्या परकीय गुंतवणुकीपेक्षा सर्वाधिक आहे. असे करताना महायुती सरकारने आपलाच २०१६-१७ या आर्थिक वर्षाचा विक्रम मोडला आहे. अर्थात या आर्थिक वर्षातील एक तिमाही आणखी बाकी आहे."
**— देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री





# गुंडाची गुडघ्यावर चालत धिंड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यातील भारती विद्यापीठ परिसरात गाड्यांची तोडफोड करणाऱ्या आरोपींची वरात काढत पोलिसांनी यांना चांगलाच धडा शिकवला आहे. अक्षरशः गुडघ्यावर चालायला लावून ज्या ठिकाणी गाड्यांची तोडफोड केली. त्याच ठिकाणी या आरोपींची धिंड काढण्यात आली आहे. भारती विद्यापीठ पोलिसांच्या या कामगिरीचे त्या भागातील नागरिकांकडून कौतुक केले जात आहे

दहशत माजवण्यासाठी मंगलमूर्ती सहकारी गृह रचना मर्यादित सोसायटीत २ जणांनी गाड्यांची तोडफोड केली होती. संबंधित प्रकाराची तक्रार भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनल दाखल करण्यात आली होती. तक्रारीची तातडीने दखल घेत पोलिसांनी २ दिवसात आरोपींना अटक केली. भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन हद्दीमध्ये कात्रज गुजरवाडी रोड येथील भारत नगर येथे लाईट नसल्याचा फायदा घेत अज्ञातांनी १० वाहनांची तोडफोड केली होती. त्यांना धडा शिकवत पोलिसांनी त्याच भागात धिंड काढली. दहशत माजवण्यासाठी पुणे शहरातील उपनगरात गाड्या तोडफोडीचे प्रमाण वाढू लागले आहे. या गुन्हेगारी प्रवृत्तीने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आता या गुन्हेगारीला आळा घालण्याचे मोठे आव्हानच पोलिसांसमोर उभे राहिले आहे.

## मराठी व्यक्तीवर परप्रांतीय महिलांचा हल्ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईच्या जुहू परिसरात भरदिवसा मराठी माणसावर परप्रांतीय महिलांनी हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. जुहू लोटस आय हॉस्पिटलसमोर असलेल्या गॉड गिफ्ट वसाहतीत या घटनेने मोठी खळबळ उडवली आहे. तीन बहिणींनी मिळून एका मराठी नागरिकाला मारहाण केली. ही घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

# हा देश गांधी, नेहरूंचा

## राष्ट्रीय जनता दलाचे खासदार खा. डॉ. मनोज कुमार झा यांचे प्रतिपादन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आज देशातील वातावरण तापले आहे. ते भयंकर विषारी झाले आहे. महात्मा गांधींची हत्या करणाऱ्याचे कौतुक करणारे संसदेची पायरी चढतात हा फरक या देशात झाला आहे. हा देश गांधी, नेहरूंचा आहे. या देशाला जिवंत राहायचे असेल आणि श्वास घ्यायचा असेल तर गांधी गांधी करावे लागेल, असे प्रतिपादन राष्ट्रीय जनता दलाचे राज्यसभेतील खासदार डॉ. मनोज कुमार झा यांनी शुक्रवारी केले. तुषार गांधी लिखित द लास्ट डायरी आफ कस्तुर माय बा या पुस्तकाच्या मराठी अनुवादित पुस्तकाचे, द्वादशीवार लिखित स्मरण तसेच विविध पुस्तकांचे प्रकाशन यावेळी झाले.

"बापूंवर बोलणारे, ऐकणारे कमी होत चालले आहेत. परिस्थिती बदलली नाही तर आपल्या सारखे लोक केवळ संग्रहालयात असतील. गांधी आज असते तर त्यांनाही यूएपीए कायदा लावण्यात आला असता. औरंगजेब, बाबर आणि तुघलक यांच्या बाजूने किंवा विरोधात बोलून बातम्यांमध्ये राहण्याचे काम काही लोक सध्या करत आहेत. सध्याचे नेते अहंकाराने ग्रस्त आहेत. आपण आल्याने प्रकाश आला आणि आपण गेल्यानंतर अंधार पसरेल असे त्यांना वाटते. या लोकांपेक्षा देश मोठा आहे."
**— डॉ. मनोज कुमार झा,** राष्ट्रीय जनता दलाचे राज्यसभेतील खासदार

महाराष्ट्र गांधी स्मारक निधीतर्फे कोथरूड येथील गांधी भवन येथे आयोजित तीन दिवसीय गांधी विचार साहित्य संमेलनाचे उद्घाटन डॉ. मनोज कुमार झा यांच्या हस्ते झाले. संमेलनाध्यक्ष सुरेश द्वादशीवार, महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी, स्वागताध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख, स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी, ज्येष्ठ नेते उल्हास पवार, विश्वस्त डॉ. शिवाजीराव कदम, गीताली वि म, सचिव अन्वर राजन, एम. एस. जाधव, मिलिंद गायकवाड, रमेश आढाव, प्रा. मच्छिंद गोरडे, अप्पा अनारसे आदि उपस्थित होते.

## लाडक्या बहिणींसाठी गुड न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्र सरकारद्वारे सुरू करण्यात आलेली लाडकी बहीण योजना सातत्याने चर्चेत आहे. कधी या योजनेतील महिलांना अपात्र ठरवल्याने, तर कधी या योजनेतील रक्कमेतील वाढ करण्यामुळे सातत्याने या योजनेची चर्चा होत आहे. या योजनेंतर्गत जवळपास अडीच कोटी महिलांना दर महिन्याला १५०० रुपये दिले जातात. आज शनिवारी (दि. ८) जागतिक महिला दिन साजरा करण्यात येणार आहे. याच पार्श्वभूमीवर महायुती सरकारने लाडक्या बहिणींसाठी मोठं 'गिफ्ट' देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर सरकारकडून अनेक योजना करण्यात येत आहे. आता राज्यातील लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना दोन महिन्यांचे हप्ते एकाच दिवशी दिले जाणार आहे.

» पान ५ वर

# आगामी आर्थिक वर्षात जीडीपी ६.५ टक्क्यांवर?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जागतिक अनिश्चितता असूनही २०२५ ते २०३१ या कालावधीत भारताचे सकल देशांतर्गत उत्पादन सरासरी ६.७% दराने वाढण्याचा अंदाज क्रिसिलने व्यक्त केला आहे. क्रिसिलच्या मते आगामी आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये जीडीपी ६.५% राहण्याचा अंदाज आहे. सामान्य मान्सून, आवाक्यात असणारी महागाई आणि सुलभ चलन धोरण अशा अनेक घटकांमुळे भारतीय विकासाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

क्रिसिलचे मुख्य अर्थतज्ज्ञ धर्मकीर्ती जोशी म्हणाले की, जागतिक आव्हाने संपली आहेत, असे मला वाटत नाही. आता परिस्थिती तात्पुरती बदलत असल्याचे दिसत आहे. पण आपण परिस्थिती पूर्णपणे सुधारण्याची वाट पाहिली पाहिजे. काही उद्योग क्षेत्रे अमेरिकेच्या व्यापार धोरणांमधील संभाव्य बदलांबाबत अधिक संवेदनशील असतात. अतिआयात शुल्क किंवा व्यापार निर्बंधांमुळे कापड, वाहनांचे सुटे भाग, हिरे आणि दागिने या उद्योग क्षेत्रांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. पण अमेरिकेत आरोग्यसेवा उत्पादनांची मागणी जास्त असल्याने औषध उद्योगावर परिणाम होण्याची शक्यता कमी आहे.

विकासाच्या मुख्य घटकांपैकी उत्पादन क्षेत्र हे एक आहे. जे आर्थिक वर्ष २०२५ ते आर्थिक वर्ष २०३१ पर्यंत

» पान ५ वर

### जीडीपीत काही अंशी सुधारणा

- सध्याच्या कठीण जागतिक परिस्थितीत चालू आर्थिक वर्षाच्या डिसेंबर तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर ६.२ टक्के होता. ऑक्टोबर-डिसेंबर तिमाहीत देशाचा जीडीपी ६.२ टक्के वाढला तर जुलै-सप्टेंबर २०२४ मध्ये विकास दर ५.६ टक्के होता. अशा प्रकारे जीडीपी वाढ सात तिमाहींमधील सर्वात कमी पातळीपासून सावरण्यात यशस्वी झाली आहे.








"Women's empowerment is intertwined with respect for human rights."
Dr. Medha V. Kulkarni
Member of Parliament, Rajya Sabha
Government of India
HAPPY WOMEN'S DAY


॥ स्त्रीशक्तिरतुल्या सदा ॥
उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री
अजितदादांची लाडक्या
बहिणींना महिला दिनाची भेट.
मुख्यमंत्री माझी
लाडकी बहीण योजना
महिला दिनाच्या पूर्वसंध्येला
लाडक्या बहिणींना मिळणार
दोन महिन्यांचा सन्मान निधी
सन्मान निधी
रु.3000/-
घड्याळ तेच
वेळ नवी
रुपाली निलेश चाकणकर
अध्यक्ष, राज्य महिला आयोग. । प्रदेशाध्यक्षा, राष्ट्रवादी महिला काँग्रेस.
Rupali Chakankar rupali_chakankar chakankarspeaks

# जीबीएसचे थैमान शमले नाही

## पुणेकरांनो काळजी घ्या; महानगरपालिकेचे दुर्लक्ष

पुणे शहरात १३८ ठिकाणचे पाणी पिण्यास अयोग्य असल्याचे समोर आले आहे. आरोग्य विभागाकडून तपासणी केली जात आहे. त्यामुळे पुणेकरांचा आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. धायरी आणि नऱ्हे परिसरात गेल्या आठवड्यात नवीन संशयित रुग्ण नोंदविले गेले आहेत. त्यामुळे या भागात तातडीन शुद्ध पाण्यासाठी उपाय योजन कराव्यात तसेच या भागातील पाण्याची तपासणी करावी, असे पत्र आरोग्य विभागाने पालिकेच्या पाणी पुरवठा विभागास दिले आहे. सिंहगड रस्ता परिसरात महिनाभर थैमान घालणाऱ्या गुलेन बॅरे सिंड्रोमची (जीबीएस) साथ ओसरली, असे वाटत असतानाच या साथीने पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. काही दिवसांपासून समाविष्ट गावांमध्ये या आजाराची लक्षणे असलेले रुग्ण आढळून येत आहेत.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यामध्ये अनेक ठिकाणचे पाणी पिण्यासाठी चांगले नसल्याची धक्कादायक माहिती उघड झाली आहे. एकीकडे पुण्यामध्ये जीबीएसने थैमान घातले आहे तर दुसरीकडे पुण्यामध्ये दुषित पाणी पुरवठा होत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे पुणेकर जे पाणी पितात ते खरंच पिण्यासाठी योग्य आहे की नाही असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

पुणे शहरात १३८ ठिकाणचे पाणी पिण्यास अयोग्य असल्याचे समोर आले आहे. आरोग्य विभागाकडून तपासणी केली जात आहे. पालिकेकडून पुरवठा विभागाला शुद्ध पाणी पुरविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दुषित पाणी पुरवठा होत असल्याची माहिती समोर येताच पुणेकर चिंतेत आले आहेत.




सिंहगड रस्ता परिसरात गुइलेन बॅरे सिंड्रोमचा उद्रेक झाल्यानंतर महापालिकेने पाणी तपासणी मोहीम हाती घेतली. या परिसरातील पाण्याचे नमुने सातत्याने तपासण्यात येत आहेत. आतापर्यंत ७ हजार १९५ नमुने तपासण्यात आले असून त्यातील १३८ पाणी नमुने पिण्यास अयोग्य आढळले आहेत. या प्रकरणी महापालिकेच्या आरोग्य विभागाने पाणीपुरवठा विभागाला दूषित नमुने आढळलेल्या भागात शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्याची सूचना करण्यात आली आहे.

- राज्यात जीबीएसची रुग्णसंख्या २२४
- १९५ रुग्णांचे जीबीएस निदान झाले
- जीबीएसचे आतापर्यंत सर्वाधिक रुग्ण पुण्यात

**रुग्णसंख्या**

- पुणे महापालिका ४६,
- महापालिकेत नव्याने समाविष्ट गावे ९५,
- पिंपरी-चिंचवड पालिका ३३,
- पुणे ग्रामीण ३६ अशी आहे.
- राज्यात इतर जिल्ह्यांत आतापर्यंत १४ रुग्ण

● डेक्कन येथील खासगी रुग्णालयात एका सात वर्षीय मुलावर जीबीएसचे आयसीयूमध्ये व्हेंटिलेटरवर उपचार सुरू आहेत. हा मुलगा मानाजी नगर, नवले ब्रिज परिसरातील रहिवासी असून, तो पुणे महापालिकेच्या पाणीपुरवठ्यावर अवलंबून आहे. दिनानाथ मंगेशकर रुग्णालयातही धायरी गावातील एका रुग्णाला गंभीर स्थितीत दाखल करण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी ससून रुग्णालयात दाखल असलेल्या एका १० वर्षीय रुग्णाच्या पाणीपुरवठ्याच्या स्त्रोतांची तपासणी करण्यात आली होती. तपासणीमध्ये मानाजीनगर येथील खासगी विहिरीचे पाणी आणि एका खासगी आर.ओ.प्रकल्पाचे पाणी वापरत असल्याचे समोर आले आहे. तर, या पूर्वीच्या तपासणीत या आर.ओ. प्रकल्पाचे पाणी दूषित असल्याचे समोर आले आहे.

"राज्यात आढळलेल्या एकूण रुग्णांपैकी २६ जणांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. १५ रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत. राज्यभरात १७८ रुग्णांना उपचार करून घरी सोडण्यात आले आहे. जीबीएसमुळे आतापर्यंत ११ जणांचा मृत्यू झाला आहे,

**- आरोग्य विभाग**

## पाच जागांसाठी महायुतीतील मित्रपक्षांमध्ये रस्सीखेच

**पुणे :** विधानसभा निवडणुकीनंतर आता विधान परिषद निवडणुका जाहीर झाल्या आहेत. विधान परिषदेच्या पाच रिक्त जागांसाठी ही निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये भाजपला तीन शिंदेंच्या शिवसेनाला एक आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीला एक अशा पाच जागांसाठी ही निवडणूक आहे. या पाच जागांसाठी महायुतीतील मित्रपक्षांमध्ये मोठ्या प्रमाणात रस्सीखेच पाहायला मिळत आहेत.

विधान परिषदेचा आमदार होण्यासाठी इच्छुक नेत्यांकडून जोरदार फील्डिंग वरिष्ठांकडे सुरू आहे. पुण्यातील देखील दोन नेते या आमदारकीसाठी दावेदार असल्याचे बोललं जाते. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून शहराध्यक्ष दीपक मानकर यांनी विधान परिषदेच्या आमदारकीसाठी दावा केला आहे. मागील वेळी देखील मानकर यांनी आपल्याला संधी मिळावी अशी मागणी केली होती. मात्र संधी डावल्यानंतर त्यांनी थेट राजीनामा अस्त्र देखील उभारले होते. यावेळेस मानकर यांना संधी दिल्याची जाण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. भाजपचे माजी आमदार जगदीश मुळीक यांना देखील विधान परिषदेची उमेदवारी मिळण्याची दाट शक्यता आहे.



## कल्याणी पॉवरट्रेनची तैवानच्या कॉमपल इलेक्ट्रॉनिक्स सोबत भागीदारी

**पुणे :** भारत फोर्जची पूर्ण मालकीची उपकंपनी कल्याणी पॉवरट्रेनने कॉमपल इलेक्ट्रॉनिक्स, इंक सोबत भारतात X86 प्लॅटफॉर्म सर्व्हर उत्पादनासाठी कॉमपल इलेक्ट्रॉनिक्स, इंक सोबत तंत्रज्ञान परवाना करार केला आहे. दोन्ही पक्षांनी भारतात स्थानिक पातळीवर उत्पादन सुविधांचा उपयोग करून सर्व्हर व्यवसाय विकसित करण्यासाठी सामंजस्य करार (MOU) केला असून तो भारत सरकारच्या 'मेक इन इंडिया' धोरणाशी सुसंगत आहे. कॉमपल कडून KPTL ला सर्व्हरशी संबंधित तांत्रिक मदत पुरवली जाईल. त्यामध्ये स्थानिक उत्पादन, असेंब्ली, चाचणी प्रक्रिया आणि अंतिम विक्रीच्या देखरेखीचा समावेश असेल. कल्याणी पॉवरट्रेनच्या इलेक्ट्रॉनिक्स विभागाने फेब्रुवारी २०२५ मध्ये महाराष्ट्रातील पुणे येथील अत्याधुनिक उत्पादन केंद्रातून 'मेड इन इंडिया' सर्व्हर सादर करण्याची घोषणा केली. कंपनीने शेअर बाजाराला दिलेल्या माहितीमध्ये नमूद केले की, "हा कारखाना स्थानिक व्यवसायांना चालना देईल, गुंतवणूक आकर्षित करेल आणि या प्रदेशाच्या उत्पादनक्षमता वाढीस महत्त्वपूर्ण योगदान देईल."



## सोनालिकाची फेब्रुवारी २०२५ मध्ये भरधाव प्रगती

**पुणे :** भारतातील नंबर १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिका ट्रॅक्टरने फेब्रुवारी'२५ मध्ये १०,४९३ एकूण ट्रॅक्टर विक्रीची शानदार कामगिरी करून आर्थिक वर्ष'२५ च्या अंतिम टप्प्यात प्रवेश केला आहे. सर्वोत्तम उत्पादन आणि सेवा प्रदान करण्याच्या आपल्या बळकट मूलभूत मूल्यांच्या आधाराने कंपनीने १,१३,२७९ ट्रॅक्टर विक्रीसह आतापर्यंतच्या सर्वोच्च देशांतर्गत वार्षिक (इयर टू डेट) विक्रीचा टप्पा फेब्रुवारी'२५ मध्ये गाठला आहे. तसेच उद्योगाच्या वार्षिक कामगिरीलाही मागे टाकले आहे. खरोखरच अजिंक्य परिणाम आणि विपुल यश मिळविण्यासाठी शेतकऱ्यांकरिता नावीन्यपूर्णता आणि शक्ती सुनिश्चित करून सोनालिका भारताच्या विकास प्रवासात सक्रिय योगदान देत आहे. इंटरनॅशनल ट्रॅक्टर लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक रमण मित्तल म्हणाले, फेब्रुवारी २५ मध्ये एकूण १०,४९३ ट्रॅक्टर विक्रीची नोंद झाल्याबद्दल आम्हाला खूप आनंद होत आहे..आमच्या प्रगत शेती तंत्रज्ञानामुळे वेगवेगळ्या प्रदेशात आणि उपयोगांत सर्वोत्तमपेक्षाही चांगले उत्पादन मिळत राहून पीक उत्पादन वाढत राहील.

## पाण्यासाठी आक्रमक; नागरिक उतरले रस्त्यावर

**पुणे :** गेल्या काही दिवसांपासून पुण्यातील अनेक भागात पाटी टंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहे. त्यातच काही ठिकाणी दूषित आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. अधिकारी पाण्याच्या टाक्या भरण्याऐवजी टँकरने पाणीपुरवठा करायला प्राधान्य देत असल्यामुळे नागरिक संतप्त झाले आहेत. प्रभाग क्रमांक तीन मधील धनलक्ष्मी सोसायटी, गणेशनगर, सुनितानगर, दत्तप्रसाद सोसायटी, जगदंबा सोसायटी तसेच संपूर्ण खराडी, वडगावशेरी परिसरात प्रचंड प्रमाणात पाणी टंचाई जाणवत आहे.टाटा गार्डरूम येथील पाण्याच्या टाक्या पूर्ण क्षमतेने भरत नाही त्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याचे सांगत टँकर पॉइंट सुरू ठेवण्याकडे अधिकाऱ्यांचा कल असल्याची बाब माजी नगरसेविका श्वेता खोसे गलांडे यांनी पाणीपुरवठा प्रमुखांच्या लक्षात आणून दिली. तसेच पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.

## खोट्या माहितीच्या आधारे २८ लाखांची शिष्यवृत्ती

**पुणे :** आई वडील उच्चशिक्षित असून चांगल्या पदावर नोकरीवर असूनही गरिबांना दिली जाणारी शिष्यवृत्ती एका सदन कुटुंबातील विद्यार्थ्यांनी फसवून घेतल्याचे समोर आले आहे. आई वडील दोघेही सुपर क्लास वन अधिकारी असताना वडील प्लंबर असल्याची खोटी माहिती देऊन मुलीच्या शिक्षणासाठी परदेशी शिष्यवृत्ती लाटण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या विद्यार्थिनीने तब्बल २८ लाख ९५ हजार रुपयांच्या शिष्यवृत्तीचा लाभ घेतल्याचे दिसून आले आहे. या गंभीर प्रकरणाची चौकशी इतर मागास बहुजन कल्याण विभागाने केली असता, त्यामध्ये ही गंभीर बाब उघडकीस आली आहे. याप्रकरणी विद्यार्थीनीसह तिच्या आई-वडीलांवर कारवाई करण्याची शिफारस इतर मागास बहुजन कल्याण विभागाने राज्य शासनाकडे केली आहे. मात्र मंत्रालय स्तरावरून याप्रकरणी कोणतीही हालचाल होताना दिसत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. याप्रकरणी एका व्यक्तीने एप्रिल २०२४ मध्ये दिलेल्या तक्रारीनुसार इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या प्रादेशिक उपसंचालक यांनी चौकशी केली असता त्यामध्ये शिष्यवृत्ती लाटल्याचे उघड झाले आहे. या मुलीचे वडील हे राज्य सरकारच्या आरोग्य विभागात प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, तर आई महिला बाल कल्याण विभागात उपायुक्त आहेत. आई वडीलांचे वार्षिक उत्पन्न हे ३३ लाख रुपये आहे. तरी हवेली तहसिल कार्यालयातून खोट्या कागदपत्राच्या आधारे वडिलांनी प्लंबर असल्याचे दाखविले व वार्षिक २ लाख ४० हजार रुपयांचा उत्पन्नाचा दाखला घेतल्याचे समोर आले

# 'सूर्यदत्त' विद्यार्थी संवाद कार्यक्रम संपन्न

## आयपीएस सुनील फुलारी 'सूर्यदत्त सूर्यभूषण राष्ट्रीय पुरस्कार २०२५' प्रदान

आयपीएस सुनील फुलारी यांनी गुन्हे व त्याचे बदलते स्वरूप, तंत्रज्ञानाचा अतिरेक, सोशल मीडियाचा गैरवापर, सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण यावर भाष्य केले त्यांच्या संवाद कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन मिळाले. कम्युनिटी पोलिसिंग, नागरिकांचा विश्वास, सोशल मीडियाचा योग्य वापर गरजेचा असल्याचे त्यांनी नमूद केले. महिलांच्या बाबतीत आपण अधिक सजग राहण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांमध्ये आनंद पाहायला मिळाला. त्यांनी फुलारी यांना अनेक प्रश्न विचारले. शंकांचे निरसन करून घेतले.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बावधन :** कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक (आयपीएस) सुनील फुलारी यांना कायदा सुव्यवस्था, राष्ट्रसेवेसाठी 'सूर्यदत्त सूर्यभूषण राष्ट्रीय पुरस्कार २०२५' प्रदान करण्यात आला. 'सूर्यदत्त'च्या बावधन कॅम्पसमधील बन्सीरत्न सभागृहात विद्यार्थ्यांसाठी आयोजित संवाद कार्यक्रमावेळी सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या हस्ते सुनील फुलारी यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सर्व संचालक, विभागप्रमुख, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, फार्मसी, फिजिओथेरपी, विधी, एमबीए, एमसीए, आणि इतर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याआधी सूर्यदत्त सूर्यभूषण राष्ट्रीय पुरस्कार पोलीस आयुक्त विजयकुमार चौबे, पोलीस अधीक्षक संजय जाधव आदींना प्रदान करण्यात आला.




सुनील फुलारी गेल्या अनेक वर्षांपासून प्रशासकीय सेवा, सामाजिक विकास, कायदा सुव्यवस्था, नेतृत्व विकास करण्यासाठी भरीव योगदान देत आहेत. २०२५ मध्ये फुलारी यांना राष्ट्रपती पदक मिळाले आहे. त्याआधी पोलीस पदक राष्ट्रपतींच्या हस्ते मिळाले होते. न्याय, सुरक्षा व कायद्याची अमलबजावणी करण्यात कुशल नेतृत्व, अथक परिश्रम याची पावती म्हणून या पुरस्काराकडे पाहता येईल.

भारतीय ज्ञान परंपरेअंतर्गत फुलारी यांनी विद्यार्थ्यांशी विदेश संवाद साधला. भविष्य घडवण्यात स्वतःच्या भूमिकेवर विचार करायला हवा. केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या विकासासाठी योगदान देणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. आपल्या दीर्घ पोलीस सेवेतून मिळवलेल्या अनुभवांचे कथन करत समाजाची प्रामाणिकपणे आणि निष्ठेने सेवा करण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

### विद्यार्थ्यांना मिळाला उत्तम मार्गदर्शक

● विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांना उत्तरे देताना सुनील फुलारी यांनी शंकांचे समाधान केले. त्यांच्या महत्वपूर्ण व प्रात्यक्षिक मार्गदर्शनाने उपस्थित सर्वांनाच प्रेरणा मिळाली. फुलारी यांनी विद्यार्थ्यांना विचारशील राहण्यास, आपल्या उद्दिष्टांप्रती निष्ठावान राहण्यास आणि समाजाच्या विकासासाठी सक्रिय योगदान देण्यास प्रवृत्त केले. पोलिसिंग, कायदा व सुव्यवस्था, पोलीस व नागरिक यांच्यातील संबंध यावर त्यांनी प्रकाश टाकला.



"शिक्षण घेत असताना केवळ व्यक्तिगत विकासाचा विचार करू नये. आपल्या शिक्षणाचा उपयोग समाजाच्या व राष्ट्राच्या विकासात योगदान देण्यासाठी करावा. आयुष्यातील प्रत्येक अनुभव आपल्याला समृद्ध होण्यासाठी उपयुक्त असतो. त्यामुळे प्रत्येक क्षण आपण जगला पाहिजे. शिस्तबद्ध, एकाग्रतेचे वातावरण राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन वेळेत मोबाईलच्या वापरापासून दूर राहायला हवे.

**- प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया**

# परांजपे स्कीम्स कन्स्ट्रक्शनला "ग्रेट प्लेस टू वर्क" प्रमाणपत्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** परांजपे स्कीम्स कन्स्ट्रक्शन लिमिटेड (PSCL) ही एक बहुराज्यीय रिअल इस्टेट विकासक कंपनी आहे. पुणे येथील मुख्यालयातून कार्यरत असलेली ही कंपनी पश्चिम भारतातील ३ राज्य ८ शहरांमध्ये आपली सेवा देते.

कंपनीला अधिकृतपणे "ग्रेट प्लेस टू वर्क" प्रमाणपत्र देण्यात आले आहे. हे प्रमाणपत्र त्या संस्थांना दिले जाते ज्या उच्च विश्वास आणि उच्च कार्यक्षमता संस्कृतीला प्रोत्साहन देतात. हे प्रमाणपत्र मिळवून, परांजपे स्कीम्स कन्स्ट्रक्शन लिमिटेडने एक उत्कृष्ट कार्यस्थळ निर्माण करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावली आहे, या ठिकाणी कर्मचारी स्वतःला मूल्यवान, समर्थित आणि प्रगतीसाठी प्रेरित वाटतात. जागतिक कार्यसंस्कृती प्राधिकरणाकडून मिळालेल्या या प्रमाणपत्राचे मूल्य कर्मचाऱ्यांच्या अभिप्रायांवर आणि संस्थेच्या कार्यपद्धतींवर आधारित आहे. हे प्रमाणपत्र परांजपे स्कीम्स कन्स्ट्रक्शन लिमिटेडला कर्मचारी-केंद्रित दृष्टिकोन आणि भक्कम संस्थात्मक मूल्यांसाठी ओळखल्या जाणाऱ्या टॉप कंपन्यांमध्ये स्थान देणारे आहे.

१९८७ मध्ये स्थापन झालेली ही कंपनी आजपर्यंत २५ दशलक्ष चौरस फूट क्षेत्रफळाच्या २०० हून अधिक प्रकल्पांची यशस्वी पूर्तता केली आहे. कंपनी मुख्यतः वसाहती टाउनशिप, उच्च-प्रिमियम निवासी संकुल, विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) आणि वरिष्ठ नागरिकांसाठी विशेष गृहसंकुलांच्या विकासात आघाडीवर आहे.

सध्या ८०० हून अधिक पूर्णवेळ व्यावसायिक या संस्थेत कार्यरत असून, कंपनी ३५ प्रकल्पांवर (२ कोटी चौ. फूट क्षेत्रफळ) कार्यरत आहे.



"हे प्रमाणपत्र आमच्या प्रत्येक कर्मचाऱ्याच्या विश्वास आणि प्रेमाशिवाय शक्य झाले नसते. आमचे कर्मचारी आमच्या यशाचा मूलभूत आधार आहेत. आम्ही अशा संस्कृतीचा अभिमान बाळगतो जिथे ते भरभराट करू शकतात."

**— अमित परांजपे**
डायरेक्टर, बिझनेस डेव्हलपमेंट, परांजपे स्कीम्स कन्स्ट्रक्शन लिमिटेड

# 'गीत रामायण' कार्यक्रमात रसिक मंत्रमुग्ध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रामायणाचे प्रत्यक्ष जिवंत चित्ररूप दर्शवणारे विविध रागातील गीत, शास्त्रीय संगीतातून अत्यंत सुरेल अशा आवाजामध्ये झालेले सादरीकरण. रामायणातील विविध भाग म्हणजेच श्रीरामांचा जन्म, सीता स्वयंवर, राम शौर्य वर्णन, भरत आक्रोश, शुर्पनखा त्रागा, राम सेतू निर्मिती, राम विजया नंतर पुन्हा अयोध्येमधील आगमन हा संपूर्ण भाग सादर होत असताना उपस्थित सर्व मंत्रमुग्ध झाले. निमित्त होते ढोले पाटील एज्युकेशन सोसायटी, खराडी, पुणे येथे आयोजित दत्ताजी चितळे यांच्या 'गीत रामायण' या कार्यक्रमाचे. याप्रसंगी संस्थेचे चेअरमन सागर ढोले पाटील,माजी आमदार कमलताई उल्हास ढोले पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच संस्थेच्या सेक्रेटरी उमा सागर ढोले पाटील यांच्या समवेत शैक्षणिक, सामाजिक, प्रशासकीय क्षेत्रातील उच्च पदस्थ अधिकारी उपस्थित होते. 'गीत रामायण' सादरीकरणात दत्ताजी चितळे यांच्यासमवेत गायक तुषार रिठे, प्रार्थना साठे, डॉ. भक्ती दातार, अमिता घुगरी, वादकः अमित कुंटे, दीप्ती कुलकर्णी, ओंकार पाटणकर, उद्धव कुंभार यांचा सहभाग होता. ढोले पाटील एज्युकेशन सोसायटीचे प्राचार्य, शिक्षक, प्राध्यापक, स्टाफ, विद्यार्थी व पालक वृंद, पुणे पूर्व विभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**पुणे** रामायणाचे प्रत्यक्ष जिवंत चित्ररूप दर्शवणारे विविध रागातील गीत, शास्त्रीय संगीतातून अत्यंत सुरेल अशा आवाजामध्ये झालेले सादरीकरण. श्रीरामांचा जन्म, सीता स्वयंवर, राम शौर्य वर्णन, भरत आक्रोश, शुर्पनखा त्रागा, राम सेतू निर्मिती, राम विजया नंतर पुन्हा अयोध्येमधील आगमन हा संपूर्ण भाग सादर होत असताना उपस्थित सर्व मंत्रमुग्ध झाले.

# युवक काँग्रेसकडून महिला अधिकाऱ्यांचा सन्मान




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जागतिक महिला दिन म्हणजे नारी शक्तीचा सन्मान करण्याचा, महिलांच्या कार्यकर्तृत्वाला सलाम करण्याचा दिवस म्हणून महिला दिनाच्या औचित्याने जगभरात महिलांच्या दृष्टीने विविध उपक्रम राबवले जातात. पुणे सह जिल्हा निबंधक वर्ग एकचे संतोष हिंगाणे व सह जिल्हा निबंधक वर्ग दोनचे मंगेश खामकर यांच्या पुढाकाराने महिला अधिकाऱ्यांचा सन्मान म्हणून शहरातील सर्व दुय्यम निबंधक हवेली क्र.१ ते २७ या २७ कार्यालयांचा पदभार दि. ७ मार्च २०२५ रोजी सर्व महिला अधिकाऱ्यांकडे सोपवण्याचा अनोखा उपक्रम राबवण्यात आला होता.

महिला दिनाच्या निमित्ताने पदभार प्राप्त पुणे शहरातील सर्व महिला दुय्यम निबंधक व सह जिल्हा निबंधक महिला अधिकाऱ्यांचा पुषगुच्छ देऊन युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस रोहन सुरवसे पाटील यांनी सत्कार केला व शुभेच्छा दिल्या.

दस्त नोंदणीचे कामकाज शासन आणि नागरिक यांच्यासाठी अतिशय महत्वाचे आहे. असे जबाबदारीचे काम महिला समर्थपणे पेलू शकतात हे या निमित्ताने दिसून आले. सर्व २७ दुय्यम निबंधक, तसेच विवाह अधिकारी या पदांचा कार्यभार महिला अधिकारी यांचेकडे देण्यात आला होता.

तसेच, सह जिल्हा निबंधक (वर्ग-1) या पदाचा कार्यभार संगिता जाधव पठारे यांच्याकडे तर, सह जिल्हा निबंधक (वर्ग-2) या पदाचा कार्यभार राजश्री खटके यांच्याकडे एक दिवसासाठी सोपवण्यात आला होता.

"सह जिल्हा निबंधक पुणे शहर कार्यालयाने मागील वर्षीच्या महिलादिनी देखील हा उपक्रम राबविला होता. हा उपक्रम खरोखरचं स्तुत्य आहे. राज्याचे नोंदणी महानिरीक्षक रविंद्र बिनवडे, राज्याचे नोंदणी उप महानिरीक्षक उदयराज चव्हाण व पुणे विभागाचे नोंदणी उपमहानिरीक्षक दिपक सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत चांगला कार्यक्रम झाल्याचे दिसून आले. पुढील महिलादिनी पुणे शहराप्रमाणे राज्यभरात या प्रकारचा उपक्रम राबवून महिला अधिकाऱ्यांचा सन्मान व्हावा. महिला दिनाच्या जगभरातील सर्व माता भगिनींना शुभेच्छा.

**— रोहन सुरवसे-पाटील,**
सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस

पान १ वरून...

## आर्थिक पाहणी सर्वेक्षण...

इतका आहे. महसुली जमा ४ लाख ९९ हजार ४६३ कोटी रुपये अपेक्षित तर महसुली खर्च ५ लाख १९ हजार ५१४ कोटी अपेक्षित आहे. राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालानुसार, राज्याचे २०२४-२५ चे स्थूल उत्पन्न ४५ लाख ३१ हजार ५१८ कोटी इतके आहे. स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत कर्ज आणि व्याजापोटी १७.३ टक्के रक्कम खर्च होत आहे. महाराष्ट्राचा आर्थिक विकास दर ७.३ टक्के राहील. कृषी क्षेत्राचा विकास ८.७ टक्के, उद्योग क्षेत्राचा विकास ४.९ टक्के तर सेवा क्षेत्राचा विकास ७.८ टक्के असणार असल्याचेही यात नमूद करण्यात आले आहे. प्रस्तुत अहवालानुसार, महाराष्ट्रात नोव्हेंबर २०२४ पर्यंत १८८४ शिवभोजन केंद्र कार्यरत आहेत. २०२४-२५ मध्ये नोव्हेंबर महिन्यापर्यंत ३.९७ कोटी शिवभोजन थाळींचा लाभ लोकांनी घेतला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत तृणधान्ये, कडधान्ये, तेलबिया व कापूस यांच्या उत्पादनात अनुक्रमे ४९.२ टक्के, ४८.१ टक्के, २६.९ टक्के व १०.८ टक्के वाढ अपेक्षित आहे. ऊस उत्पादनात मागील वर्षाच्या तुलनेत ६.६ टक्के घट अपेक्षित आहे. मागील वर्षाच्या तुलनेत तृणधान्ये व कडधान्याच्या उत्पादनात अनुक्रमे २३ टक्के व २५ टक्के वाढ अपेक्षित आहे. तेलबियांच्या उत्पादनात मागील वर्षाच्या तुलनेत २२.७ टक्के घट होणार आहे. २०२३-२४ मध्ये फलोत्पादन पिकांखालील क्षेत्र २१.७४ लाख हेक्टर अपेक्षित असून ३२६.८८ लाख मे. टन उत्पादन अपेक्षित आहे.

## महाराष्ट्र अव्वलच

देखील त्यांनी व्यक्त केला आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, १५ लाख कोटींचे सामंजस्य करार दावोसमध्ये केले आहे. त्यातील ४५ प्रकल्पात सिरियस प्रोग्रेस झाली आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात करार केले. देशात झालेल्या पाच लाख कोटींचे सामंजस्य करार दावोसमध्ये केले आहे. त्यातील ४५ प्रकल्पात सिरीअस प्रोग्रेस झाली आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात करार केले. देशात झालेल्या कराराचे गुंतवणूकीत रुपांतर होण्याचा दर ३५ ते ४५ टक्के आहे. आपल्याकडे हाच दर ८० ते ९१ टक्के आहे.

## आगामी आर्थिक वर्षात...

दरवर्षी सरासरी ९.० टक्क्यांनी वाढण्याची अपेक्षा आहे, जे कोरोना महामारीच्या आधीच्या दशकात सरासरी ६ टक्के होते. भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनात उत्पादन क्षेत्राचा वाटा आर्थिक वर्ष २०२५ मध्ये सुमारे १७ टक्के होता. आता तो २० टक्क्यांपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. गेल्या तिमाहीतील वाढीचा आकडा रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या अंदाजापेक्षा कमी आहे. आरबीआयने आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या तिस-या तिमाहीत ६.८ टक्के वाढीचा अंदाज वर्तवला होता. त्या तुलनेत ही सुधारणा कमी आहे. सरकारने आता पूर्ण आर्थिक वर्षासाठी जीडीपीचा अंदाज किरकोळ वाढवून ६.५ टक्के केला तर मागील अंदाज ६.४ टक्के होता. पण हे आकडे आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या ९.२ टक्के सुधारित वाढीच्या अंदाजापेक्षा खूपच कमी आहेत.

## लाडक्या..

याबाबत महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी अधिकची माहिती दिली आहे. महिला दिनाचे औचित्य साधून फेब्रुवारी आणि मार्च महिन्याचा हप्ता लाडक्या बहिणींना एकत्र देणार आहोत,अशी घोषणा आदिती तटकरे यांनी केली आहे. त्यांनी लाडक्या बहिणींबाबत महायुती सरकारने घेतलेला निर्णय जाहीर केला आहे. त्या म्हणाल्या की, "खात्यात थेट वितरित करणार आहोत. २ कोटी ५२ लक्ष महिलांना हा हप्ता वितरित करण्यात येणार आहे. एकही महिना असा नाही की महिलांना लाडक्या बहिण योजनेचा हप्ता मिळाला नाही.

# चहा प्रेमींसाठी मालपाणीज् बेकलाईटचे आकर्षण

## मिल्क चाय टोस्ट आणि ब्राउन चाय टोस्ट लॉन्च

**भारतात चहाच्या वेळी होणाऱ्या अल्पोपहाराला एक आधुनिक आणि आरोग्यदायक ट्विस्ट देत मालपाणीज् बेकलाईटने नाविन्यपूर्ण चाय टोस्ट्स सादर केले आहेत. कंपनीच्या वतीने नुकतीच याबाबतीत अधिकृत घोषणा करण्यात आली. स्वच्छता आणि पोषण यावर लक्ष केंद्रित करून चहाच्या वेळी अल्पोपहार करण्याच्या पारंपारिक संकल्पनेला पुनरुज्जीवित करणे, तसेच आजच्या व्यस्त आणि आरोग्याबाबत जागरूक ग्राहकांसाठी चहाच्या वेळी उत्तम अनुभव देण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे.**




### फक्त दोन टोस्ट आणि चिंता दूर...

- मालपाणीज् बेकलाईटच्या २ टोस्ट असलेल्या सॅशेमुळे ही चिंता दूर होते. यामध्ये मिल्क चाय टोस्ट आणि ब्राउन चाय टोस्ट हे दोन प्रकार उपलब्ध आहेत. हे दोन्ही वैयक्तिकरित्या पॅक केलेले, स्वच्छ आणि उत्कृष्ट घटकांपासून बनवलेले असून चहाच्या वेळी वापरल्या जाणाऱ्या पारंपारिक स्नॅक ला एक आरोग्यदायक पर्याय ठरतात. मिल्क चाय टोस्ट च्या एका पॅकची किंमत ८ रुपये आणि ब्राउन चाय टोस्टची किंमत १० रुपये आहे.
- मोठ्या संख्येने व्यावसायिक चहाच्या ब्रेकच्या वेळेस झटपट तसेच पौष्टिक पर्याय शोधत आहेत. त्यांच्यासाठी चाय टोस्ट्सच्या रूपाने एक स्वादिष्ट आणि स्वच्छ पर्याय उपलब्ध झाला आहे. प्रवासासाठी सोयीचे असलेले हे टोस्ट्स भारतातील लोकप्रिय पेयाच्या प्रथेसाठी अत्यंत पूरक आहेत.
- भारतात चहा पिण्याची परंपरा नेमाने पाळली जात असली तरी, अनेक लोकप्रिय स्नॅक रस्त्याच्या कडेला असलेल्या चहाच्या दुकानांवर जार मध्ये विकले जातात. त्यामुळे स्वच्छतेचे धोके उत्पन्न होतात आणि त्यात अनेकदा पौष्टिक मूल्यांचा अभाव असतो.

- मिल्क चाय टोस्ट हा दुधाने समृद्ध असून त्यामध्ये आवश्यक पोषक तत्वे आणि समृद्ध चव प्रदान करतो.
- तो परिपूर्ण पणे भाजून त्याला कुरकुरीत बनविला जातो.
- गहू, सोया पीठ आणि माल्ट पीठापासून बनवलेला ब्राउन चाय टोस्ट हा फायबरने समृद्ध असलेला पर्याय असून तो पचनक्रियेला मदत करतो.
- पौष्टिक आणि हलका नाष्ट्याच्या शोधात असलेल्यांसाठी हा आदर्श पदार्थ आहे.
- हे चाय टोस्ट सॅकरिन, ब्रोमेट्स आणि कृत्रिम रंगांपासून मुक्त आहेत.
- चवीशी तडजोड न करता निरोगी स्नॅकिंग चा अनुभव मिळतो.
- मालपानीज बेकलाईटचे नवीन चहा टोस्ट आता महाराष्ट्रातील सर्व दुकानांवर खरेदीसाठी उपलब्ध आहेत किंवा ते www.malpanifoods.com वेबसाइटवरून ऑर्डर करता येतील.

**"आमचे चहा टोस्ट तुमच्या चहाच्या वेळेला पूरक ठरतील. चव आणि स्वच्छतेशी तडजोड न करता आरोग्याबाबत जागरूक जीवनशैलीशी ते सुसंगत असतील, अशा रीतीने ते बनविलेले आहेत.**

**- सचिन मालपाणी,**
व्यवस्थापकीय संचालक, मालपाणीज् बेकलाईट

# जुन्या वाड्यांच्या पुनर्विकासाबाबत मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**पुणे :** पुणे शहरातील विशेषत गावठाण भाग असणाऱ्या पेठांमधील जुन्या वाड्यांच्या पुनर्विकासाला गती देण्यासाठी आमदार हेमंत रासने यांनी आग्रही भूमिका घेतली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत शासकीय धोरणामध्ये सुधारणा करण्याची मागणी केली आहे. ठाणे तसेच मुंबईमध्ये करण्यात आलेल्या सुधारित धोरणांच्या धर्तीवर पुणे शहरासाठी स्वतंत्र सुधारित धोरण राबवावे. सोबतच कसबा मतदारसंघाला संपूर्ण झोपडपट्टी मुक्त करण्यासाठी प्रशासकीय मंजुरी प्रक्रिया देखील सुलभ करण्याची मागणी रासने यांनी केली आहे.

शहरातील अनेक वाड्यांचे बांधकाम अतिशय जिर्ण अवस्थेत असून नागरिकांना धोकादायक परिस्थितीत राहावं लागत आहे. विद्यमान नियमांमधील तांत्रिक अडथळ्यांमुळे वाड्यांच्या पुनर्विकास रखडलेला आहे.

त्यामुळे मुंबई आणि ठाणे शहरात राबवण्यात आलेल्या धोरणानुसार पुण्यासाठी स्वतंत्र धोरण राबवण्यासाठी विशेष समिती स्थापन करण्यात यावी. यासाठी संबंधित विभागाची उच्चस्तरीय बैठक आयोजित करून हजारो नागरिकांच्या जिव्हाळ्याचा विषय सोडवण्याला गती देण्याची मागणी रासने यांनी केली आहे. या मागणीवर मुख्यमंत्री कार्यालयाकडून गृहनिर्माण आयुक्तांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**"पुणे शहर आणि कसबा मतदारसंघातील जुन्या वाड्यांच्या पुनर्विकासासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. नागरिकांना सुरक्षित आणि चांगल्या सुविधा मिळाव्यात तसेच पुण्यासाठी स्वतंत्र धोरण राबवण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. मुख्यमंत्री महोदयांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून लवकरच योग्य कार्यवाही होईल".**

**- हेमंत रासने**









संपादकीय विशेष

# सक्षमीकरणाला हवा समाजाचा हात

भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात महिलांचे स्थान महत्वाचे असले तरी अनेक ठिकाणी महिलांना आव्हानांचा सामना करावा लागतो, हे सत्य आहे. विशेषतः शहरी आणि ग्रामीण भागातील महिलांचे जीवन कठीण असते. एकीकडे अशी उदाहरणे दिसत असली तरी महिलांच्या अधिकारांसाठी आणि सशक्तीकरणासाठी भारतात अनेक सकारात्मक बदलही घडत असल्याचे नाकारण्यात अर्थ नाही. त्यामुळेच या सकारात्मकतेचा कसा वापर करुन घ्यायचा यावर महिला दिनाच्या मुहुर्तावर मंथन होणे गरजेचे आहे. अलिकडच्या काळात भारतातील महिलांच्या सशक्तीकरणाच्या प्रक्रियेत काही महत्त्वपूर्ण घडामोडी घडल्या आहेत. उदाहरणार्थ, 2025 च्या केंद्रिय अर्थसंकल्पामध्ये महिला सशक्तीकरणासाठी विविध घोषणा करण्यात आल्या. या घोषणांमध्ये विशेषतः ग्रामीण भागातील महिलांसाठी 'वर्धित रोजगार योजना', महिला उद्योजकतेला चालना देणारी 'नवीन कृषी धोरण' आणि महिलांच्या सुरक्षिततेसाठी कायद्यात सुधारणा या योजनांचा समावेश आहे. खेरीज सरकारने जाहीर केलेल्या नानाविध योजनांमध्ये महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यावर भर दिला आहे. अलिकडे महिलांच्या आरोग्याविषयीही अनेक महत्त्वपूर्ण धोरणे पुढे आली आहेत. ग्रामीण भागातील महिलांना गरोदरपणाच्या काळात आरोग्य सेवांचा अधिक आणि चांगला पुरवठा करण्यासाठी केंद्र सरकारने महिला स्वास्थ्य योजना सुरू केली असून मानसिक आरोग्याच्या बाबतीत जास्त जागरूक होण्यासाठी सरकारने कार्यक्रम सुरू केले आहेत. महिला आणि मुलींच्या सुरक्षिततेसाठी सरकारने 'महिला सुरक्षा नोडल' योजनेची सुरुवात केली आहे. मात्र पुण्यातील बसमधील बलात्काराच्या घटनेसारख्या दुर्दैवी प्रकारांचे आव्हान समोर आहेच.

महिला नेतृत्व आणि त्यांच्या राजकीय सहभागाचा मुद्दा घेतला तर आता भारताच्या राजकारणात महिला नेतृत्वाचे महत्त्व अधिक वाढत आहे. 2025 च्या लोकसभेतील निवडणुकांमध्ये महिला प्रतिनिधींच्या संख्येत वाढ पहायला मिळाली. सध्या भारतातील अनेक राज्यांमध्ये महिला नेतृत्व महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. दिल्लीतील नवीन सरकारची धुरा एका महिलेच्या हाती आली आहे. महाराष्ट्रामध्ये 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' चर्चेत आहेच. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी महिलांच्या सशक्तीकरणासाठी विशेष योजना सुरू केली असून या माध्यमातून महिलांना पोलिस सेवेत प्रवेश मिळवण्याची सोय आहे.. त्याचबरोबर महिलांचे शिक्षण आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी विविध धोरणे लागू करण्यात आली आहेत. 26 फेब्रुवारी 2025 रोजी केंद्र सरकारने 'महिला शिक्षण योजने'अंतर्गत जास्त शिष्यवृत्त्या आणि स्टार्ट-अप्ससाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याची घोषणा केली. यामुळे देशभरातील ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांना शिक्षण आणि उद्योजकतेमध्ये अधिक संधी मिळणार आहे. महिलांसाठी, विशेषत: आयटी आणि विज्ञान क्षेत्रात अधिक रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावरही भर देण्यात आला आहे. विशेषत: स्टार्ट-अप्स आणि घरगुती उद्योगांमध्ये महिलांचा वाढता सहभाग उत्साहवर्धक म्हणावा लागेल. याबाबत केंद्र सरकारने आखलेल्या 'महिला उद्योजकता योजनां'मधून छोटे उद्योग सुरू करण्यासाठी आर्थिक सहाय्य दिले जात आहे. परिणामी, महिला सशक्त होऊन आपल्या कुटुंब आणि समाजासाठी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनतील, अशी अपेक्षा व्यक्त करता येते.

महिलांचे सशक्तीकरण केवळ त्यांच्याशी संबंधित नाही तर संपूर्ण समाजाच्या उन्नतीसाठीही आवश्यक आहे हेदेखील आपण लक्षात घ्यायला हवे. यातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे स्त्रियांकडे बघण्याच्या पुरुषांच्या भूमिकेत बदल होण्याची गरज आहे. कारण महिला सशक्तीकरणाची प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी पुरुषांच्या मानसिकतेमध्ये बदल होणे अत्यावश्यक आहे. पिढ्यानपिढ्या महिलांसंबंधीची भेदभावाची मानसिकता बदलण्यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीची भूमिका महत्त्वाची ठरते. म्हणूनच आताच्या काळातही लग समानतेबद्दल जागरूकतेचा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. महिलांना कारकीर्दीच्या क्षेत्रात, घरातील जबाबदाऱ्या कवा इतर सामाजिक भूमिका निभावताना समान संधी मिळाल्या तर अनेक पेच सोडवणे सहजशक्य होईल. याबाबत पुरुषांकडे फक्त महिलांना सहाय्य करणारे कवा सुरक्षित ठेवणारे म्हणून पाहू नये, तर त्यांच्या स्वावलंबनाला प्रेरणा देणारे म्हणूनही भूमिका बजवावी लागेल. थोडक्यात, महिलांना समोर आणण्यासाठी आधी पुरुषांनी त्यांचे स्थान आणि अधिकारही स्वीकारले पाहिजेत.

ही मानसिकता बाणवण्यासाठी कुटुंबातील सर्व सदस्यांनी विचार करायला हवा. वडीलधाऱ्यांद्वारे मुलांना शिक्षित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांना लहानपणापासून लग समानतेचा मुद्दा, महिलांच्या हक्कांबद्दलची जागरूकता आणि विविध क्षेत्रांमधील योगदानाची माहिती दिली तर जाणीवा समृद्ध होण्यास मोठी मदत होऊ शकते.

जीवनशैलीतील बदल हा मुद्दाही या अनुषंगाने महत्त्वाचा ठरतो. जसे की, घरातील कामांमध्ये पुरुषांचा सहभाग वाढवणे, मुलांच्या शिक्षण आणि घरगुती जबाबदाऱ्यांबाबत पुरुषांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे हे मुद्देही घर आणि समाजात एक नवीन मानसिकता निर्माण करु शकतात. एकीकडे हे बदल होत असताना दुसरीकडे पुरुषांनी कार्यस्थळावरही महिलांना समान संधी देण्यासाठी योग्य ती भूमिका अंगिकारणे गरजेचे आहे. त्यांनी महिला सहकाऱ्यांचा आदर केला पाहिजे. त्यांना सन्मान दिला पाहिजे आणि त्यांच्या कामाची योग्य कदर केली पाहिजे. या सगळ्याच्या बरोबरीने महिलांना पगाराच्या दृष्टीने समान संधी मिळणे हेदेखील त्यांच्या सबलीकरणाच्या दिशेने पुढचे पाऊल टाकण्यासारखे आहे. कारण आजही अनेक क्षेत्रामध्ये पुरुषांएवढेच, प्रसंगी त्यांच्यापेक्षा अधिक कष्टाचे काम करुनही महिलांना कमी मोबदला मिळतो. घरगुती कामाचे तर कधीच मोल केले जात नाही. हा चर्चेत राहणारा एक चिरंतन मुद्दा आहे. महिलांवर कार्यस्थळी होणारा अन्याय, त्यांच्यावरील हसाचाराच्या वाढत्या घटना काळजी वाढवणाऱ्या आहेत. त्यामुळेच एका-दुसऱ्या व्यक्तीने नव्हे तर, महिलांना त्यांच्या स्वातंत्र्यासाठी आणि विकासासाठी प्रेरित करण्यास संपूर्ण समाजाने सज्ज होण्याची गरज आहे. हे केल्यासच समाजातील महिलांचे स्थान सशक्त होईल आणि लग समानता आणखी मजबूत होईल.

# 'वेग आणि वाढ' साधणार केव्हा?

**जागतिक महिला दिन वा यासारखे निमित्त निर्माण करत महिलाविषयक प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम होत असले तरी, पूर्वीपेक्षा प्रश्न फारसे वेगळे दिसत नाहीत. आजही महिलांविषयक प्रश्नांचा गुंता गुंतागुंतीचा आणि जटीलच आहे कारण आजही महिलांना अनुकूल असणाऱ्या सामाजिक, कार्यालयीन, सांस्कृतिक, सामाजिक वातावरणाचा अभावच आहे. ही इको सिस्टीम सुधारेपर्यंत बदलाची अपेक्षा करण्यात अर्थ नाही.**

चर्चेत

रमा सरोदे
विधिज्ञ

जागतिक महिला दिनाच्या औचित्याने यंदाच्या 'वेग आणि वाढ' या थीमची माहिती घ्यायला हवी. कारण दरवर्षीप्रमाणे या पुढचा काळही स्त्रीविषयक प्रश्नांचा बराच उहापोह होईल. त्यांचा समाजातील स्तर उंचावण्याच्या हेतूने काही प्रश्नांची उत्तरे शोधली जातात. मात्र असे सगळे असूनही आजही त्यांच्या मूलभूत समस्या सुटलेल्या आहेत की नाही, हे बघणे आवश्यक आहे.

1975 मध्ये युनायटेड नेशन्सने 'डिकेड फॉर वुमेन' जाहीर केले त्याला यंदा 50 वर्षे पूर्ण झाली. त्यानंतरच्या, म्हणजेच साधारणत: 1983 नंतरच्या काळात स्त्रीविषयक कायद्यांमध्ये बरेच बदल झालेले आपण पाहिले. त्याच दशकात म्हणजे 1979 मध्ये 'सीडॉ' (कन्व्हेन्शन ऑन द एलिमिनेशन ऑफ ऑल फॉर्म्स ऑफ डिस्क्रिमिनेशन अगेंस्ट वुमन) आले. याला आपण महिलांविरुद्ध भेदभाव निर्मूलन समिती असेही म्हणू शकतो. जगाबरोबर आपणही याचा स्विकार केला आणि महिलांसाठी कायदे येऊ लागले. त्यात हुंडाप्रतिबंधक वा हुंडाबळीविषयक कायदा, 498 सारखा कौटुंबिक हिंसाचारविषयक कायदा आदींचा समावेश होतो. आधी कौटुंबिक हिंसाचारविषयक कायदा फौजदारी कायदा होता. पण बहुचर्चीत मथुरेशा प्रकरणानंतर पुराव्यासंदर्भातील कायदा बदलण्यात आला. बलात्काराची घटना घडल्यानंतर आपली संमती नसल्याचे एखादी स्त्री सांगते तेव्हा हे सिद्ध करण्याची जबाबदारीही तिच्यावरच होती. कारण फौजदारी कायद्यामध्ये फिर्यादीवरच ही जबाबदारी असते. आपला कायदा सिद्ध झाल्याशिवाय संशयिताला गुन्हेगार मानत नाही. मात्र मथुरेशा प्रकरणामुळे हा कायदा बदलला. म्हणजेच महिलांच्या या शतकात असे अनेक महत्त्वपूर्ण बदल घडले आहेत आणि घडतही आहेत. मात्र असे असले तरी खरोखरी महिला त्याचा वापर करु शकत आहेत का, हा प्रश्न उरतो. कारण हे तेव्हाही मोठे आव्हान होते आणि आजही आव्हानच आहे.

आताचे प्रश्न फारसे वेगळे नाहीत. कौटुंबिक हिंसाचाराचा प्रश्न आहेच. पण 2005 मध्ये दिवाणी स्वरुपाचा एक वेगळा कायदा आला. याचे कारण म्हणजे सासरच्या लोकांना गुन्हेगार ठरवण्यात महिलांना रस नसल्याचे लक्षात आले, कारण असे सिद्ध झाल्यास तीच बेघर होते. तिला पोटगी मिळत नाही, कारण नवराच तुरुंगात जातो. माहेरचा पाठिंबा नसेल तर ती फार काही करु शकत नाही. म्हणजेच असे कायदे असले तरी अडचणीही तेवढ्याच होत्या. यातून तिला हक्क मिळत नव्हता. म्हणूनच दिवाणी कायदा आणून संवादातून प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र संवाद होण्यासाठी आधी हिंसा थांबणे गरजेचे आहे. या हेतूने आधी उल्लेख केलेला 2005 चा कौटुंबिक हिंसाचार कायदा आला. त्यामध्ये एक व्यापकता बघायला मिळाली. ती म्हणजे फौजदारी कायदा फक्त लग्न झालेल्या स्त्रियांना संरक्षित करत होता. पण या दिवाणी कायद्याच्या कक्षा रुंद होत्या. त्यामुळेच रक्ताचे नाते असेल, दत्तक घेतल्यामुळे वा लिव्ह इन तसेच लग्नाच्या अशा कोणत्याही नात्याला या कायद्याने डेमोस्टिक नाती मानले आणि त्यातील हिंसाचाराला कौटुंबिक हिंसाचाराच्या कक्षेत आणले. आधी स्त्रीला वडिलोपार्जित मालमत्तेतही हक्क नव्हता. मात्र नंतर यातही बदल होत महिलेलाही वडिलोपार्जित मालमत्तेत हक्क मिळाला पाहिजे, हा विचार स्विकारला गेला. 2005 मधील कायद्याद्वारे झालेला हादेखील एक महत्त्वाचा बदल म्हणावा लागेल.

हे सगळे बदल महिलांना पुढे घेऊन जाण्याच्या दृष्टीने अत्यंत सकारात्मक आहेत. मात्र तरीही अनेक प्रश्न सुटलेले नाहीत. शिक्षणापासून दूर राहणाऱ्या मुलींची संख्या मोठी आहे. मुलींचा बालविवाह होण्याचे प्रमाण वाढत आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्यातही हे प्रमाण वाढताना बघायला मिळते. म्हणजेच मुलीकडे एक ओझे वा जबाबदारी म्हणून बघण्याची मानसिकता वा वृत्ती पूर्वीही होती आणि आजही त्यात फारसा बदल झालेला दिसत नाही. यातूनच मग गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायदा आणावा लागला. यातूनच महिलांना कोणकोणत्या पातळीवर संरक्षित करण्यासाठी कायदे आणावे लागले, हे कळते. आज 'मुलगी नको' म्हणण्यामागे ती आपल्याला मोक्ष देऊ शकणार नसल्याचा धार्मिक विचार पुढे येताना दिसतो. तिला शिक्षण दिले तर सासरी जाऊन तिकडेच पैसे देणार असल्यामुळे आपला खर्च वाया जाण्याची भावना वा भूमिका असणारा पालकवर्ग आजच्या समाजातही पहायला मिळतो. एकंदरच सामाजिक, आर्थिक अशा अनेक पैलूंनी पाहता ती ओझे असल्याचे मत अद्यापही पूर्णपणे बदललेले दिसत नाही. याचाच परिणाम म्हणून ती मुख्य प्रवाहातून मागे राहिली आणि अजूनही मागेच रहात आहे.



'समान कामासाठी समान मोबदला' हा समतेचा निकष आजही अनेक महिलांना अनुभवायला मिळत नाही. आकडेवारी बघता, तितकेच काम केले तरी आजही महिलेला कामासाठी पुरुषांच्या तुलनेत समान पैसे मिळताना दिसत नाहीत. गर्भारपणासाठी महिलेला ठराविक काळ पगारी रजा देणारा कायदा चांगला असला तरी, असे पैसे द्यावे लागू नयेत, यासाठी अनेक कंपन्यांकडून घातले जाणारे जाचक नियमही बरेचदा चर्चेत असतात. खेरीज लहान मूल असणाऱ्या स्त्रीला काम देण्यासही अनेकांचा नकार असतो. म्हणजेच घरातही तिला पूरक वातावरण नसते तर दुसरीकडे कार्यस्थळीदेखील त्याचा अभावच असतो. थोडक्यात, ही सगळी इको सिस्टीमच विरोधात असल्यामुळे कितीही कायदे केले आणि कितीही ठराव संमत झाले तरी स्त्रियांना पोषक वातावरणाची अद्यापही प्रतीक्षा आहे, असे म्हणावे लागेल.

वरील सर्व उदाहरणे आताच्या काळात समानता आली आहे, या मताचे खंडन करतात. स्त्रीची कुवत, ताकद, चातुर्य, क्षमता ओळखणारी आणि या गुणांचा गौरव करत तिचे स्थान मान्य करणारे अतिशय मोजकी ठिकाणे पहायला मिळतात. आजचा समाज तिच्यातील कौशल्याचा हवा तितका पुरस्कारही करत नाही आणि प्रोत्साहनही देत नाही. इथेही तिला स्त्री असल्याच्या मर्यादांच्या जाळ्यात अडकवण्याचा प्रयत्न होताना दिसतो. बहुचर्चित 'मी-टू' चळवळीद्वारे स्त्रियांना सहन कराव्या लागणाऱ्या अशा अनेक गोष्टी समोर आल्या आहेतच.

टॉलिवूडसंबंधीचा जस्टिस हेमा रिपोर्टही या प्रश्नावर प्रकाश टाकणारा म्हणावा लागेल. यामध्ये दाक्षिणात्य फिल्म इंडस्ट्रीमध्ये लैंगिक छळ सोसणाऱ्या अनेकजणींनी कमिटीपुढे येऊन गाऱ्हाणे मांडले खरे, पण आता त्यांची कामे गेलेली आहेत. आज कोणीही त्यांना काम देण्यास तयार नाही. त्यामुळेच आपण यंदाच्या महिला दिनानिमित्त जाहीर झालेल्या 'वेग आणि वाढ' या थीमचा विचार करतो तेव्हा हे होण्यासाठी काय काय करणे गरजेचे आहे, हे अधिक गांभीर्याने पहायला हवे. केवळ कायदे करुन चालणार नाही तर समाजाची मानसिकता बदलली आहे का, याचा विचार व्हायला हवा. आता तरी आपण महिला हे करु शकतात, महिला हे करु शकत नाहीत वा काही कामे महिलांची नाहीतच किंवा काही कामे महिलांनीच केली पाहिजेत; अशा मानसिकतेतून बाहेर येणे गरजेचे आहे. ते साधत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने थीममध्ये व्यक्त केलेली वेग आणि वाढीची स्थिती महिलांचे आयुष्य उजळून टाकताना दिसणार नाही.

केवळ लिंगआधारितच नव्हे तर जाती, धर्म, लैंगिकता या सर्व पातळ्यांवर महिलांना समान पातळीवर ठेवून मान मिळणे गरजेचे आहे. कारण या प्रत्येक पातळीवर उतरंडीत महिला अगदी शेवटच्या पायरीवर दिसतात. जात व्यवस्थेबाबत बघायचे तर त्या जातीची ती महिला सर्वात खाली असते. धर्माबाबतही ती महिला सर्वात खालीच दिसते. कारण त्या जातीतील वा धर्मातील पुरुषच प्रथम स्थानी दिसतो. म्हणजेच कोणताही निकष लावला वा कोणतेही क्षेत्र घेतले तरी पुरुषांच्या तुलनेत ती नेहमी खालच्या जागीच दिसते वा तिला जाणीवपूर्वक तिथेच ठेवले जाते. शिडीतील तिचा क्रम अभावानेच वरचा दिसतो. त्यामुळेच समानतेचे मूल्य केवळ दाखवून चालणार नाही तर आता ते प्रत्यक्षात उतरवण्याची गरज आहे. त्यासाठी खऱ्या अर्थाने महिलांच्या गरजा काय आहेत, हे समजून घ्यायला हवे. एकदा ते समजले की समानता आणि सहभागाचा खरा मेळ घालणे शक्य होईल. त्यांच्या गरजेनुसार वातावरण तयार झाले तरच खरी क्षमता बाहेर येऊन त्या इतिहास घडवू शकतील. हा विचार आता तरी पुढे यायला हवा.

(शब्दांकन: स्वाती पेशवे)

## खेचाखेची

### जागा झाली आहे!

मन्या, जन्या आणि सोन्या हे तिघे जण बेडवर झोपलेले असतात. पण बेडचा आकार लहान असल्यानं तिघांना झोपायला खूप अडचण होत असते.

.

.

म्हणून जन्या उठून खाली जमिनीवर झोपायला जातो.

तेव्हा मन्या उठतो आणि म्हणतो

.

अरे मित्रा, ये रे वर... आता जागा झालीये.


## वेगळं काही

एरिझोनाचा डलास वेगस वेगळ्या पद्धतीने लोकांची मदत करतो. डलास पाण्यात बुडालेल्या मौल्यवान वस्तूंचा शोध घेतो आणि या वस्तू तो मालकांपर्यंत पोहोचवतो. नदी, तलाव तसंच सरोवरांच्या तळाशी डुबकी घेऊन तो वस्तू शोधतो. आत्तापर्यंत पाण्यात पडलेले अनेक महागडे मोबाईल, कॅमेरे, पर्सेस, चष्मे आणि क्रेडिट कार्डस त्याने शोधून काढले आहेत. वस्तू सापडल्यानंतर तो त्याचे व्हिडिओ यूट्यूबवर अपलोड करतो. ते पाहिल्यानंतर लोक त्याच्याशी संपर्क साधतात आणि ओळख पटवून वस्तू परत घेतात. डलासने आजवर शंभरपेक्षा जास्त मोबाईल शोधले आहेत. सोन्या-चांदीची नाणी, दागिने, बंदुकाही त्याला सापडल्या आहेत.

## विचार करा
संगोपन

आपल्याकडील बौद्धिक मूल्यमापनाची पद्धत अत्यंत चुकीची आहे. क्रमिक पुस्तकांतला अभ्यास समजत नाही किंवा लक्षात ठेवून लिहिता येत नाही, ती मुलं कुचकामी असल्याचं समजलं जातं. अशा स्थितीत हे जग फक्त हुशार आणि मध्यम बुद्धीच्या मुलांनी जगण्याच्याच योग्यतेचं आहे असं कमी बुद्धिमत्ता असणाऱ्या मुलांना वाटू लागतं त्यावेळी ती नाराज होतात. स्वतःवरच चिडतात, निराश होतात आणि स्वतःपासून आणि त्यांना समजून घेऊ न शकणाऱ्या पालकांपासून दूर पळून जाण्याच्या नादात आत्महत्येचा प्रयत्न करतात. अशा वेळी जगण्यासाठी क्रमिक शिक्षण हाच एकमेव उपयुक्त मार्ग आहे का, याचा विचार पालकांनी केला पाहिजे. एखाद्या मुलाला दहावी पास होता नाही आलं तर त्याला त्याच्या आवडत्या विषयाचं प्रशिक्षण देऊन करिअर करू दिलं तर काय बिघडेल? ते मूल आपल्या क्षेत्रात हिरीरीनं पुढे जाईल. निदान आत्महत्या करून अकालीच आयुष्य कुस्करून टाकणार नाही. मुलांना आत्महत्त्यांसाठी प्रवृत्त करणारं दुष्टपणाचं संगोपन नकळत आपल्याकडून घडत नाही ना याचा पालकांनी विचार केला पाहिजे.






## राशीभविष्य

- मेष : काही प्रभावी लोकांनी मदत केल्याने उत्साह वाढेल. आर्थिक गुंतवणूक करु शकाल.
- वृषभ : घर सुशोभीत करण्यासाठी आकर्षक वस्तूंची खरेदी कराल. मोठी आर्थिक उलाढाल होईल.
- मिथुन : नोकरीच्या शोधात असणाऱ्यांना सुसंधी लाभतील. नाविन्यपूर्ण कलाकृतींचा ध्यास घ्याल.
- कर्क : नोकरीत वरिष्ठांकडून कामाची जबाबदारी सोपवली जाईल. करमणुकीच्या कार्यक्रमाचा आस्वाद घ्या.
- सिंह : समाजात आपल्या मतांचा आदर होईल. धाडसी निर्णय घेतले जातील. कामाची आखणी कराल.
- कन्या : बौद्धिक आणि कलाक्षेत्रात सुसंधी लाभतील. कामाचा ताण वाढणार आहे. प्रतिष्ठा वाढेल.
- तूळ : जिद्द आणि महत्त्वाकांक्षेमुळे कार्यसिद्धी होईल. भागीदारीच्या व्यवसायात अनुकूलता राहील.
- वृश्चिक : विवाहेच्छुक तरुणांचे विवाह जमतील. व्यवसायातील योजना मार्गी लागतील. विकास होईल.
- धनु : विश्वास आणि प्रामाणिकपणाने कार्य सिद्धीस जाईल. भागीदारीच्या व्यवसायात प्रगती होईल.
- मकर : आरोग्याच्या जुन्या तक्रारी वाढतील. उपासनामार्गामध्ये चांगली अनुभूती येईल. संपत्ती वाढेल.
- कुंभ : व्यवसायातील निर्णय विचारपूर्वक घ्यावे. जुन्या मित्रमंडळींचा सहवास लाभेल.
- मीन : सत्कार्यासाठी प्रवास घडतील. प्रिय व्यक्तींच्या भेटीगाठी होतील. घरातलं वातावरण आनंदी राहील.

## सल्ला मोलाचा

### रागावर नियंत्रण मिळवायचं आहे?

अतिराग हानीकारक ठरतो. पुढे दिलेल्या अँगर मॅनेजमेंटच्या काही टिप्स उपयोगी पडतील...

✻ रागाचं कारण वेळीच शोधा– अनेकदा राग येतो आणि चुकीच्या प्रकारे व्यक्तही केला जातो. राग शांत झाल्यावर केलेल्या कृतीबद्दल पश्चाताप होऊ लागतो. हे टाळायचं असेल तर राग येण्यापूर्वीची परिस्थिती योग्य प्रकारे हाताळायला शिका. रागाचा पारा चढताना शरीरातही बदल होत असतात. त्या बदलांची पूर्वसुचना ध्यानात घ्या. त्यानुसार स्वत:ला सूचना द्या. ✻ ब्रेक घ्या– अनेकदा रागाचा पारा अचानक चढतो. विशिष्ट परिस्थिती किंवा विशिष्ट लोक यासाठी कारणीभूत असतात. अशा वेळी त्या ठिकाणापासून काही वेळेसाठी लांब रहा. शक्य असेल तर मोकळ्या हवेत रहा. ✻ व्यायामाची मदत– क्रोध हा आपल्यामधील अतिरिक्त उर्जेचा निचरा होण्यासाठी केलेली व्यवस्था आहे. पण हीच उर्जा व्यायाम किंवा खेळासारख्या माध्यमातून बाहेर पडत असेल तर राग अनावर होणार नाही. मेडिटेशन किंवा प्राणायामाच्या सहाय्यानेही अतिरिक्त उर्जेला विधायक रुप देता येऊ शकतं.

## ८ मार्च
दिनविशेष

- २०१३ : दहशतवाद संपेवपर्यंत पाकिस्तानबरोबरचे संबंध सुधारण्याची शक्यता नाही, पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांचं स्पष्टीकरण.
- २०१५ : ऑल इंग्लंड बॅडमिंटन स्पर्धेत कॅरोलिना मरिनकडून साईना नेहवालचा पराभव. उपविजेतेपद मिळाले.
- २०१६ : शकुंतला डोले गॅमलिन अरुणाचल प्रदेशच्या मुख्य सचिवपदी नियुक्त.
- २०१८ : आंध्र प्रदेशला विशेष राज्याचा दर्जा देण्यावरुन मोदी–चंद्राबाबूंमध्ये झालेली चर्चा निष्फळ.

## जाणून घ्या

### इंटरनेट होतंय गतिमान

इंटरनेटची गती दिवसेंदिवस वाढत चालली आहे. आधी टूजी, थ्रीजी, फोरजी आणि आता फाईव्हची तंत्रज्ञानाचा वापर होतो आहे. पुढच्या काळात तर त्यासाठी एलईडी बल्बचा वापर केला जाऊ शकतो. लायफाय तंत्रज्ञानामुळे हे शक्य होणार आहे. लायफाय तंत्रज्ञान दृष्यात्मक प्रकाशाद्वारे होणारं दळणवळण किंवा इंफ्रारेड किंवा जवळच्या अतीनील किरणांचा वापर करतं. हे तंत्रज्ञान ४०० ते ८०० टीएचझेड दरम्यानच्या दृष्यात्मक प्रकाशाचा वापर करतं. बल्ब चालू किंवा बंद करून लायफायचा वापर करता येईल. हे सगळं काही नॅनोसेकंदांमध्ये घडणार आहे. त्यामुळे उघड्या डोळ्यांनी आपण हे पाहू शकणार नाही. लायफाय तंत्रज्ञान वायफायची जागा घेणार नसलं तरी सुरक्षेच्या दृष्टीने ते उपयुक्त ठरणार आहे. प्रकाश किरणं भिंतीच्या आरपार जाऊ शकत नाहीत. त्यामुळे हे तंत्रज्ञान बंदिस्त खोलीत वापरता येणार आहे. या तंत्रज्ञानामुळे प्रतिसेकंद १० जीबी इतका डाटा ट्रान्सफर करणं शक्य होणार आहे. आयआयटी मद्रासमध्ये या प्रकल्पावर काम सुरु आहे.

## पंचांग

**शनिवार, ८ मार्च २०२५**
**जागतिक महिला दिन**
क्रोधीनामसंवत्सर, शके १९४६,
फाल्गुन शु. ९, नक्षत्र: आर्द्रा
चंद्राशी: मिथुन, योग: आयुष्मान
सूर्योदय: ६.५५, सूर्यास्त: ६.४४

## फॉरवर्डस

**कधी कधी प्रिय व्यक्तीला अशी धमकीही द्यावी लागते...**

अब हमें भी नहीं रखना शौक
तेरी मुहब्बत का,
जो रुला सकता है वो भूला भी
सकता है.

## आरोग्यमंत्र

### ताजेतवाने व्हा

शरीराची खर्ची पडलेली ऊर्जा परत मिळवण्यासाठी विश्रांतीची आवश्यकता असते हे आपण पाहिलं त्याचप्रमाणे विश्रांती वेगवेगळ्या प्रकारची असते हेदेखील जाणून घेतलं. विश्रांतीचा पुढचा प्रकार म्हणजे सेन्सरी विश्रांती. आपण सतत लॅपटॉप, कॉम्प्युटर आदी गॅझेटसमोर बसून काम करतो. त्याचप्रमाणे लाईट्स, आजूबाजूचा आवाज, कामासाठी अनेकांशी बोलावं लागणं आदी कारणांमुळे आपल्या संवेदनांवर खूप ताण निर्माण होतो. सध्या बरेच लोक घरून काम करत आहेत. असं असताना ऑनलाइन मिटींगमुळे देखील आपण या त्रासाला सामोरे जात असतो. यासाठी काम करत असताना काही वेळ तरी शांत डोळे मिटून बसणं फायदेशीर ठरेल. काम संपल्यानंतर झोपण्यापूर्वी स्वतःला इलेक्ट्रॉनिकस् माध्यमातून अनप्लग करून झोपण्यास सुरुवात करणं हीदेखील विश्रांतीची एक अवस्था आहे. त्याचप्रमाणे क्रिएटीव्ह विश्रांती महत्त्वाची असल्याचं तज्ज्ञ सांगतात. अश्या प्रकारच्या विश्रांतीमुळे आपल्याला नवीन कल्पना सुचण्यास मदत होते. आपण आवडणाऱ्या एखाद्या रम्य जागी शेवटचं कधी गेला होतात आणि तिथे निवांत कधी बसला होता हे आठवा. निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालवल्यानंतर आपल्याला क्रिएटीव्ह विश्रांती मिळते. व्यक्त होणं, छंद जोपासण्यासाठी वेळ देणं याचा समावेशही क्रिएटीव्ह विश्रांतीमध्ये होत असतो. आठवड्यातील ४० तास गोंधळून विचार करण्यात घालवत असतो. म्हणून क्रिएटीव्ह विश्रांती गरजेची असते.



## वाचा तर खरं

✻ बाईक चालवणं हे कौशल्य आहे. इतर अनेक कौशल्यांप्रमाणे तेसुद्धा विकसित करावं लागतं. त्यामुळे बाईक चालवताना उगाचच धाडस करू नका. स्वत:च्या मर्यादांमध्येच गाडी चालवा. उगाचच बाईकचा वेग वाढवू नका. ✻ बाईक चालवताना लक्ष विचलित होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. नजर चौकस असायला हवी. चारही बाजूंना लक्ष ठेवायला हवं. बाईक चालवणं वाटतं तितकं सोपं नाही. त्यामुळे छोट्या छोट्या गोष्टींकडे लक्ष देऊन तुम्ही तुमचा आणि इतरांचा प्रवास सुरक्षित होईल याची काळजी घेऊ शकता.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# जारकरवाडीत बैलगाडा शर्यतीचा थरार

## वडजादेवीच्या यात्रा उत्सवानिमित्त शर्यतींसोबत विविध कार्यक्रम पार पडणार!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** जारकरवाडी ( ता. आंबेगाव ) येथे गावचे ग्रामदैवत वडजादेवीच्या यात्रा उत्सवाच्या निमित्ताने शनिवार (दि. ८) ते सोमवार (दि. १०) रोजी बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती ग्रामस्थांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

यात्रा उत्सवाच्या पहिल्या दिवशी शनिवारी सकाळी ७ ते ८ या वेळेत देवीला अभिषेक, हारतुरे व मांडव डहाळे, सकाळी ८ ते सायंकाळी ७ या वेळेत बैलगाड्याच्या भव्य शर्यती, रात्री ९ ते ११ या वेळेत छबिना व पालखीची मिरवणूक, रात्री ११ नंतर विठ्ठलकृपा नाट्य कला मंडळ, जारकरवाडी यांच्या भारुडाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी रविवारी सकाळी ८ ते ४ या वेळेत बैलगाड्याच्या भव्य शर्यती, सायं. ४ ते ७ कुस्त्यांचा आखाडा, सायंकाळी ५ ते ८ या वेळेत शेरनी वाटप, रात्री नऊ वाजता संगीताचीराणी मंगला बनसोडे करवंडीकरसह नितीनकुमार बनसोडे करवंडीकर यांचा लोकनाट्य तमाशाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

सोमवारी बैलगाडा शर्यती संपन्न होणार आहे. बैलगाडा शर्यतीसाठी प्रथम क्रमांकासाठी ७५,०००, तर दोन्ही दिवशी पहिल्यात पहिल्या


संग्रहित छायाचित्र

येणाऱ्या गाड्यास ८००१ रुपयांचे बक्षीस दिले जाईल. द्वितीय क्रमांकसाठी ६१,००० हजार, तर दोन्ही दिवशी दुसऱ्यात पहिल्या येणाऱ्या गाड्यांसाठी ५००१ रुपयांचे बक्षीस आहे. तृतीय क्रमांकासाठी ४१,००० रुपयांचे बक्षीस तर दोन्ही दिवशी तिसऱ्यात पहिल्या येणाऱ्या गाड्यांसाठी २,५०१ रुपयांचे बक्षीस दिले जाईल. चतुर्थ क्रमांकासाठी २१,००० रुपयांचे व दोन्ही दिवशी चौथ्यात पहिला येणाऱ्या गाड्यांसाठी २,१०१ रुपयाचे बक्षीस दिले जाणार आहे.

राजा या किताबासाठी रोख रुपये चार ४००१ रूपयांचे बक्षीस दिले जाणार अजून, २० फुटांवर कांडे लावणाऱ्या विजेत्या गाड्यास २,५०१ रुपये दिले जाईल. याशिवाय प्रथम क्रमांकात आलेल्या गाड्यांची फायनल संपन्न होईल. यामध्ये प्रथम क्रमांकाच्या फायनलसाठी १५,००१, द्वितीय क्रमांकाच्या फायनलसाठी ११,००१, तृतीय क्रमांकाच्या फायनलसाठी ७००१, चतुर्थ क्रमांकाच्या फायनलसाठी ४००१ रुपयांची बक्षीस देण्यात येईल, अशी माहिती ग्रामस्थांनी दिली आहे. निमित्ताने समर्थ क्रॉप केअरचे फाउंडर मेंबर,यात्रा उत्सव समिती अध्यक्ष रामहरी दगडू देवडे यांनी देवीच्या चरणी १०१ किलोची पितळी घंटा अर्पण केली. यात्रोत्सवादरम्यान राज्याचे माजी सहकारमंत्री दिलीप रा वळसे पाटील, शिरूर लोकसभा मतदारसंघाचे प्रथम खासदार, पुणे म्हाडाचे सभापती (राज्यमंत्री) शिवाजीराव आढळराव पाटील, खासदार डॉ.अमोल कोल्हे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती देवदत्त निकम, शिवसेना पुणे उपजिल्हाप्रमुख सुरेश भोर, समर्थ क्रॉप केअरचे संस्थापक, अध्यक्ष प्रशांत गवळी उपस्थित राहणार आहेत.

### १० लाखांचा निधी

● माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या माध्यमातून नवीन घाटाच्या बांधकामासाठी दहा लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यात्रोत्सवामध्ये पंचक्रोशीतील सर्व गाडा शौकिनांनी, भाविकांनी उपस्थित राहुन यात्रेची शोभा वाढवावी असे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे. या यात्रा उत्सावाचे आयोजन नियोजन समस्त ग्रामस्थ जारकरवाडी, मुंबई, पुणे, तळेगाव, भोसरी ग्रामस्थांनी केल्याचे ग्रामस्थांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहिर केले आहे.

## युनी डायग्नोस्टिकच्यावतीने जेजुरी येथे पॅथॉलॉजी लॅब सेवा



**जेजुरी :** युनी डायग्नोस्टिकच्या वतीने जेजुरी येथील श्री मार्तंड देवसंस्थान संचलित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर डायलिसिस सेंटर मधील रुग्ण, रुग्णांचे नातेवाईक तसेच सेवेकरी यांच्यासाठी ना नफा, ना तोटा तत्त्वावर पॅथॉलॉजी लॅब तसेच रक्त संकलनाच्या दिवशी मोफत पौष्टिक नाष्टा, फळे वाटप आदी सेवा उपलब्ध करण्यात आली आहे. डायलिसिस रुग्णांचे महिन्यातून एकदा रक्त घ्यावे लागते त्यावेळी ही सेवा दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात दिली जाईल असे संचालक राहुल निकम यांनी सांगितले. लवकरच जेजुरी शहरामध्ये देव संस्थांनची अद्ययावत अशी या नफा ना तोटा तत्वावर पॅथॉलॉजी लॅब निर्माण होईल, असे श्री मार्तंड देवस्थानचे प्रमुख विश्वस्त अभिजीत देवकते यांनी यावेळी सांगितले. या उपक्रमाची सुरुवात माजी विश्वस्त सुधीर गोडसे, जयमल्हार चंपाषष्ठी मंडळाचे गणेश आगलावे, विश्वस्त डॉ. राजेंद्र खेडेकर , माजी विश्वस्त नितीन राऊत, देवसंस्थान चे व्यवस्थापक आशिष बाठे ,सतीश घाडगे, संतोष खोमणे,महेश काळे, शुभम सातपुते, ओंकार वायाळ, सुरज वायाळ, गणेश झाडे, दिगंबर मोघे अभिजीत कुदळे, रवी लाखे यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

## जिजाऊ-सावित्री सन्मान पुरस्कार जाहीर

**जेजुरी :** पुरंदर तालुका माध्यमिक महिला शिक्षिका संघाच्या वतीने ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त शैक्षणिक, क्रीडा व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या १२ महिलांना स्मृतिचिन्ह, प्रशास्तीपत्रक देऊन जिजाऊ-सावित्री सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे अशी माहिती अध्यक्षा वर्षा देसाई व सचिव मोहिनी लोणकर यांनी दिली. कस्तुरभा गांधी नॅशनल मेमो. सासवड शाखेच्या माई शेवंता चव्हाण, स्नेहांकुर द-रे-ऑफ होपच्या संस्थापिका ॲड वृषाली दातार, महसूल सहायक ऋतुजा विठ्ठल कुंभार, योगिता ईनामके, राष्ट्रीय खेळाडू अमृता दादासाहेब कटके, स्त्रीरोग तज्ञ संध्या खळदकर, सेवा निवृत्त मुख्याध्यापिका रतन चंद्रकांत टिळेकर, जिजामाता हायस्कूलच्या ज्येष्ठ शिक्षिका छाया अविनाश पोटे, पारेश्वर विद्यालय पारगाव-मेमाणे शिक्षिका कपिला जाधव, पुरंदर हायस्कुलच्या अर्चना करपे, बालसिध्दनाथ विद्यालय बेलसर येथील सरिता जगताप, एसटी बस चालक अर्चना आत्राम यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार सोहळा शनिवारी गुरुकुल करिअर अकॅडमी सासवड याठिकाणी संपन्न होत आहे. राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव, प्राचार्य नंदकुमार सागर, प्रा. उषा टिळेकर व ॲड अर्चना भैरवकर, गुरुकुल करिअर अकॅडमीचे संस्थापक अध्यक्ष संदीप टिळेकर, सेकंडरी सोसायटीचे उपाध्यक्ष सुधाकर जगदाळे, राष्ट्रपती पुरस्कार विजेते कुंडलिक मेमाणे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक संघाचे प्रवक्ते वसंतराव ताकवले, पुणे जिल्हा काँग्रेस शिक्षक विभागाचे अध्यक्ष रामप्रभू पेटकर, सरचिटणीस प्रल्हाद गिरमे, पुणे जिल्हा शिक्षक लोकशाही आघाडीचे सचिव तानाजी झेंडे, पुरंदर तालुका माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष दत्तात्रय रोकडे, शिक्षक लोकशाही आघाडीचे अध्यक्ष जालिंदर घाटे, शिक्षक परिषदेचे अध्यक्ष शिवहार लहाने, शिक्षकेतर संघाचे अध्यक्ष सिद्राम कांबळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# लांब पल्ल्याच्या गाड्यांना थांबा देण्याची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** उरुळी रेल्वे स्टेशनवर लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्यांना थांबा देण्याची, तसेच पुणे सोलापूर रेल्वे मार्गाचे विद्युतीकरण होवून सुमारे पाच वर्षांहून अधिकच काळ झाला आहे. त्यामुळे लोणावळा-दौंड लोकल या एप्रिलपासून सुरू करावी, अशा मागण्यांचे निवेदन खासदार सुप्रिया सुळे यांना नुकतेच उरुळी कांचन शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार), उरुळी कांचन प्रवाशी संघ व उरुळी कांचन ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आले.



यावेळी माजी आमदार अशोक पवार, उरुळी कांचन शहर राष्ट्रवादी कॉग्रेस (शरद पवार ) अध्यक्ष रामभाऊ तुपे, प्रवाशी संघाचे अध्यक्ष प्रकाश जगताप, माजी सरपंच भाऊसाहेब ल. कांचन, उरुळी कांचन युवक राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार ) अध्यक्ष आप्पासाहेब वाघमोडे, यशवंतचे माजी संचालक श्रीहरी कोतवाल यांचेसह अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

गेल्या अनेक वर्षापासून प्रवासी संघटनेच्या, कामगारांच्या व ग्रामस्थांच्या माध्यमातून शिरूर हवेलीच्या लोकप्रतिनिधींकडे उरुळी रेल्वे स्टेशनवर कामगारांच्या, विद्यार्थ्यांच्या, व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी लांब पल्ल्यांच्या रेल्वे गाड्यांना थांबा देण्याची मागणी केली जात आहे. तसेच पुणे दौंड लोहमार्गाला उपनगरीय रेल्वे लोहमार्गाचा दर्जा द्यावा, त्यामुळे लोणावळा - दौंड लोकल सुरु करणे हितावह होईल अशा मागण्या केल्या जात आहेत. असे असतानाही, लोकसभेमध्ये या भागाचे प्रतिनिधित्व करत असलेल्या लोकप्रतिनिधींनी त्या मंजूर करण्यासाठी नेमके काय प्रयत्न केले, हे स्पष्ट होणे गरजेचे असल्याची भावना, या भागातील जनतेकडून व्यक्त करण्यात येत आहे. महत्त्वाच्या मागण्या लोकप्रतिनिधी या नात्याने केंद्र सरकारकडून सोडवून घेण्यासाठी अपयशी ठरत असतील, तर अशा लोकप्रतिनिधींनी खासदारकीची जागा अडवू नये, ज्याला खरेच काम करायचे आहे अशांसाठी या जागा रिकाम्या करून द्याव्यात, अशी भावना व्यक्त होत आहे.

## १५ मार्चनंतर दोन दिवसाआड सासवडकरांना पाणीपुरवठा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुरंदर तालुक्यातील पाणीपुरवठा करणाऱ्या धरणातील पाणीसाठा हा कमी होत चालला आहे. बऱ्याच धरणातील पाणीसाठा तीस ते पंचेचाळीस टक्के असून, पाणीटंचाई आत्ताच जाणवू लागली आहे. तर गावागावातील पाणीपुरवठा योजना या बऱ्याच प्रमाणात अडचणीत आल्या आहेत. आता तरी उन्हाची तीव्रता जास्त असून दिवसेंदिवस त्यांच्या झळा पोहचत आहेत. त्यामुळे पाण्यावर विपरीत परिणाम होऊन, धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी झालेला दिसून येत आहे. त्यामुळे १५ मार्चनंतर सासवड नगरपरिषदेकडून दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय होईल असे वर्तवण्यात आलेले आहे.

सध्या तरी गराडे घोरवडी व वीर धरणातून सासवड शहराला पाणीपुरवठा होत आहे. परंतु गराडे धरणात ३० टक्के घोरवडी धरणात ४५ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. या योजना बरोबरच ग्रामीण भागातील गावांना सुद्धा पाणीपुरवठा चालू आहे. सायफन पद्धतीमुळे सासवडला पाणी मिळत असल्याकारणाने वीज बिलात बचत होत आहे. घोरवडी धरणातून सासवड, पिंपळे, पोमननगर, सुपे, भिवडी, पूर पोखर, दिवे या प्रादेशिक योजनेसाठी पाणी चालू आहे.

गराडे धरणातून सासवड, कोडीत, चाबळी, हिवरे, बोपगाव अशा विविध गावांना पाणीपुरवठा चालू आहे. हा पाणीसाठा ग्रामीण भागातील गावांना घोरवडी, गराडे धरणाच्या असणाऱ्या पाणीसाठा तीस ते पंचेचाळीस टक्के असणारा शिल्लक ठेवावा व सासवड नगरपरिषदेने वीर धरणातून पाणी मुबलक असल्याकारणाने १५ मार्च नंतर चालू करावे, अशी ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांची प्रतिक्रिया आहे.

गराडे धरणातील जेवढे राखीव पाणी आहे, तेवढेच सासवडसाठी घेत आहोत. परंतु काही दिवसात ते पाणी बंद केले जाईल. घोरवडीतून पाणी मिळावे, म्हणून जलसंपदा विभागाला प्रस्ताव दिला आहे. आत्ता सध्या तरी सासवडला एक दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. तर १५ मार्च नंतर दोन दिवसाआड पाणी पुरवठा करण्याचे नियोजन चालू आहे. सध्या तरी वीर धरणात मुबलक पाणी असल्याने, यावर्षी पाण्याची अडचण येणार नाही. कांबळवाडीतील पंपाचे काम केले असून, पाणीपुरवठा सुरळीत होणार आहे, अशी माहिती सासवड नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांनी दिली आहे.

## तीन तलावांचे खोलीकरण व भराव पूर्ण




**शिक्रापूर :** कान्हूर मेसाई, ता. शिरुर येथे स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून तीन वेगवेगळ्या तालावानाचे खोलीकरण तसेच पट्टी भरावचे काम करण्यात आल्याने येथील पाणी प्रश्न काही प्रमाणात संपणार असल्याने नागरिक समाधान व्यक्त करत आहे. कान्हूर मेसाई येथे आर्ट ऑफ लिव्हिंग या आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून ननवरे दळवी वस्ती तलाव, हडपदरा तलाव व धोबी वस्ती तलाव या तीन तलावांचे खोलीकरण व भरावचे काम करण्यात आले, सदर कामामुळे परिसरातील शेतकऱ्यांना पावसाळ्यामध्ये पाणीसाठा वाढून शेतीसाठी महत्त्वाचा ठरणार आहे. उद्‌घाटन प्रसंगी पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस सरचिटणीस बबन शिंदे, समाजसेवक शहाजी दळवी, माजी सरपंच सचिन पलांडे, उपसरपंच सोपान पुंडे, उद्योजक अमोल पुंडे, मनोज शिंदे, सचिव सदाशिव पुंडे, अबिद तांबोळी, मोहन पुंडे, योगेश ननवरे, अजित तळोले, राज दळवी, यांसह आदी शेतकरी उपस्थित होते. दुष्काळी भागातील पाणी प्रश्नाला हातभार लागणार असल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

## १७वर्षीय युवतीची आत्महत्या

**शिक्रापूर :** सणसवाडी, ता. शिरुर येथे सुरक्षारक्षक म्हणून नोकरी करणारे विजय शिनगारे हे बाहेर गेलेले असताना, त्यांची मुलगी अक्षरा घरात एकटी होती, सायंकाळच्या सुमारास विजय हे घरी आले असता त्यांनी मुलीला आवाज दिला. मात्र, अक्षरा प्रतिसाद देत नसल्याने त्यांनी पाहिले असता तिने छताच्या पंख्याच्या हुकाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे दिसून आले. तिला रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तिचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. यात अक्षरा विजय शिनगारे (१७, रा. सणसवाडी ता. शिरुर) या युवतीचा मृत्यू झाला आहे. पोलिसांनी आकस्मात मुत्युची नोंद केली आहे.

# स्मशानभूमीतील वृक्षराजांना मिळाले पाणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** तीर्थक्षेत्र जेजुरी शहरातील कैलास स्मशानभूमीत पाण्या अभावी येथील वृक्षराजांना घरघर लागली होती. याबाबत जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांनी तातडीने लक्ष घालून टँकर द्वारे झाडांना पाणी उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे येथील वृक्षांना जीवनदान मिळणार आहे.

जेजुरी शहरातील कैलास स्मशानभूमीत दिवंगत नगरसेवक अरुण बारभाई यांनी यांनी अनेक वर्षे मेहनत करून मोठ्या प्रमाणात वृक्षराजी वाढवून स्मशानभूमीत नंदनवन फुलवले होते. मात्र त्यांच्या निधनानंतर स्मशानभूमीतील या वृक्षांच्या संगोपनाकडे दुर्लक्ष झाल्याने पाण्या अभावी घरघर सुरू झाली होती.

याबाबत जेजुरी नगरपालिकेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांच्याशी चर्चा करून ही वृक्षराजी वाचविण्यासाठी उपाययोजना करावी, अशी मागणी करण्यात आली होती. याबाबत तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. मंगळवारी जेजुरी नगरपालिकेच्या माध्यमातून मुख्याधिकारी यांनी तातडीने टँकर द्वारे स्मशान भूमीतील वृक्षांना पाणी उपलब्ध करून दिले. नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांमार्फत स्मशान भूमीतील सर्व वृक्षांना पाणी देण्यात आले असून त्यामुळे ऐन उन्हाळ्यात या वृक्षांना जीवनदान मिळाले आहे.मागील आठवड्यात जेजुरी येथील जुन्या पालखी मैदानात वाळलेले झाड कचरा जाळल्याने पेटले होते. यावेळी ही मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांनी तातडीने अग्निशामक दल पाठवून कार्यवाही केली होती. स्मशाभूमीतील झाडांना नियमित पाणी देणार असल्याचेही इंगुले यांनी सांगितले. याबाबत कडेपठार सोशल व स्पोर्ट्स क्लबचे रवींद्र जोशी, सुधीर गोडसे यांनी मुख्याधिकारी यांचे आभार मानले.



# आळंदीत इंद्रायणी नदीघाट विकासाचे भूमिपूजन




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**आळंदी :** राज्य शासनाच्या नमामी चंद्रभागा अभियान अंतर्गत मंजूर झालेल्या इंद्रायणी नदी घाट विकासाचे कामाचे भूमिपूजन आळंदी नगरपरिषद माजी विरोधी पक्षघटनेते, नगरसेवक डीडी भोसले पाटील यांचे हस्ते भूमिपूजन, पूजा, श्रीफळ वाढवीत उत्साहात करण्यात आली.

या भूमिपूजन प्रसंगी प्रशासक तथा मुख्याधिकारी कैलास केंद्रे, माजी नगरसेवक डी. डी. भोसले पाटील, संजय घुंडरे, प्रशांत कुऱ्हाडे, रोहिदास तापकीर, सचिन गिलबिले, दिनेश घुले, प्रकाश कुऱ्हाडे,आनंदराव मुंगसे, अर्जुन मेदनकर, रामदास दाभाडे, आशिष गोगावले, संजय वडगावकर, सतीश कुऱ्हाडे, अभियंता संजय गिरमे, सचिन गायकवाड, प्रसाद बोराटे, अमित घुंडरे, विभाग प्रमुख विष्णुकुमार शिवशरण, बाळासाहेब पेटकर, सागर भोसले, आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांनी येथील केलेल्या विविध विकास कामांची माहिती देत इंद्रायणी नदी परिसर विकास कामाची माहिती देत संवाद साधला. घाटाचे विकासाचे कामाचा आदेश देण्यात आला असून दिलेल्या आदेशा प्रमाणे तसेच मंजूर निविदे प्रमाणे कामकाज सुरु होत आहे. प्रत्यक्ष कामास सुरुवात झाल्याचे आळंदी नगरपरिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांनी सांगितले.

आळंदी येथे अस्तित्वात असलेल्या इंद्रायणी नदी घाटाचा जुन्या पुला नजिक असलेला भाग अनेक वर्षांपासून अपूर्ण तसेच काटेरी झुडूपांनी व्यापलेला होता. आषाढी वारी दरम्यान मोबाईल टॉयलेट ची पाहणी करताना मुख्याधिकारी केंद्रे यांच्या निदर्शनास आल्या नंतर त्यांनी यासाठी पाठपुरावा करीत घाटाचे विकासाचे काम आता सुरु करण्यात आल्याचे सांगितले. यामुळे अनेक वर्ष वापरा विना पडून असलेल्या जागेचा वापर भाविकांना दर्शनास जाण्यासाठी घाटाची अतिरिक्त जागा उपलब्ध होत आहे.

अपूर्ण जागेत घाट बांधकामाचा परिपूर्ण प्रस्ताव मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांनी पुणे विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षते खालील नमामी चंद्रभागा अभियानाच्या कृती समितीस दिला होता. त्या प्रमाणे या विकास कामास ३ कोटी ३८ लाख रुपयांच्या खर्चास निधी मंजूर करून शासकीय नियमा नुसार निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. आळंदीतील एस.टी.पी. प्रकल्पाचे काम देखील सुरु करण्यातआले आहे. यामुळे आळंदीतून वाहणाऱ्या इंद्रायणी नदीचे दुतर्फा सांडपाणी वाहू नलिका काम पूर्ण होताच येथून वाहणाऱ्या नदीत दूषित पाणी जाणार नाही. यामुळे आळंदी शहरातील सांडपाणी नदी जाणार नाही. यातून नदीचे पावित्र्य जोपासले जाणार आहे. मुख्याधिकारी केंद्रे यांनी आळंदीत विविध विकासाची कामे मार्गी लावल्याबद्दल या भूमिपूजनाच्या त्यांचेवर कौतुकांचा वर्षाव झाला.



## बेकायदेशीर वृक्षतोड रोखण्याची मागणी

**रांजणगाव गणपती :** येथील औद्योगिक वसाहती मधील भूखंडावरील २५ ते ३० वर्षे वयाची झाडे तोडण्याचा प्रकार उघडकीस आला असून, या बेकायदेशीर वृक्षतोडीवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. या बाबत कारेगाव येथील पंकज प्रकाश गवारे यांनी बेकायदेशीर वृक्षतोड करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करणारे पत्र रांजणगाव औद्योगिक वसाहतीतील स्थापत्य विभागाचे उपअभियंता यांना दिले आहे. रांजणगांव औद्योगिक परिसरातील एफ१२ व एफ१५ या भूखंडावरील बेकायदेशीर वृक्षतोड झालेली आढळून आली असून, २५ ते ३० वर्षे जुनी कडुनिंब, बोर व इतर साधारणपणे ३० ते ४० झाडे कापलेली आढळून आली आहेत. तरी सदर प्लॉटधारकांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, आपणामार्फत ही कारवाई झाली नाही तर फौजदारी गुन्हा दाखल करून, वनविभागाची कारवाई करण्यात येईल, असे या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

## जेजुरी भाजपाच्या वतीने जानाईदेवी यात्रेला बसेसची सेवा

**जेजुरी :** महाराष्ट्राचे कुलदैवत खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीची ग्राम दैवता जानाई देवीच्या सातारा जिल्ह्यातील निवकणे येथील यात्रेसाठी महिलांसाठी जेजुरी शहर भाजपाच्या वतीने वीस लॅक्सरी बसेसची सेवा उपलब्ध करण्यात आली आहे. या बसेस मधून जाणाई देवीच्या यात्रेसाठी सुमारे ९५० महिला सहभागी झाल्या आहेत. ग्रामदेवता जानाई देवीचे मूलस्थान सातारा जिल्ह्यातील निवकणे येथे असून, गेली अनेक पिढ्या पासून जेजुरी ते निवकणे सुमारे दीडशे किलोमीटर पायी पालखी सोहळा जात असतो. या यात्रेसाठी जेजुरी शहरातून सुमारे पंचवीस हजार भाविक सहभागी होत असतात. शहरातील सर्वसामान्य कुटुंबातील महिला, ज्येष्ठ नागरिक यांना देवीचे दर्शन घेवून यात्रेत सहभागी होता यावे, यासाठी गेली नऊ वर्षांपासून जेजुरी शहर भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष गणेश दुर्योधन भोसले यांच्या माध्यमातून महिलांसाठी मोफत बसेसची सुविधा सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमाचे उद्घाटन पुणे जिल्हा भटक्या विमुक्त संघटनेचे अध्यक्ष रवींद्र खोमणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जेजुरी शहर भाजपाचे अध्यक्ष गणेश भोसले, पदाधिकारी रविंद्र कोशे, चंद्रकांत जगताप, जेजुरी शहर ओबीसी आघाडी अध्यक्ष शिवदास झगडे, सोमनाथ मदने, सागर खोमणे महिला मोर्चा अध्यक्ष उमा खुंटे, संपदा खोमणे, सुमती पुजारी, सविता घोडके आदी उपस्थित होते.

## ११ वर्षीय मुलीशी आक्षेपार्ह वर्तन

**महाळुंगे :** चाकण औद्योगिक भागात महाळुंगे जवळ द्वारका स्कूल ते वाय जंक्शन या रस्त्याने जाणाऱ्या अकरा वर्षीय मुलीला एका ३० ते ३५ वर्ष वयोगटातील नराधमाने लगतच्या टेकडीवर नेऊन अत्यंत आक्षेपार्ह वर्तन केले. सदरची घटना बुधवारी रात्री साडेदहाच्या दरम्यान घडली. याप्रकरणी संबंधित अकरा वर्षाचे मुलीच्या आईने महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यावरून तीस ते पस्तीस वर्षे वयोगटातील अंगात लाल बाह्यांचा शर्ट व ब्लु जीन्स परिधान केलेल्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित तरुण हिंदी भाषिक असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. याबाबत अधिक तपास महाळुंगे एमआयडीसी पोलीस करत आहेत.



**निसर्गपूजा उत्साहात :** जयाद्री ते सह्याद्री हा पश्चिम पाटण खोऱ्यातील निवकणे जानाई देवी जेजुरी ते निवकणे हे सुमारे दीडशे किलोमीटर अंतर पार करून, जानाईदेवी पालखी सोहळा गुरुवारी पहाटे काऊदरा सडावाघापूर येथे पोहचला, जानाई भक्त निसर्गपुजकांच्या हस्ते वसुंधरा जानाई देवीला नारळ-बिया अर्पित करीत उत्तम पाऊस पडावा, सर्वत्र निसर्ग फुलावा यासाठी प्रार्थना करण्यात आली. (छायाचित्र - विजयकुमार हरिश्चंद्रे)

## कावदरा येथे निसर्ग पूजन

**पुरंदर :** जेजुरी नगरीची ग्रामदेवता जानाई देवीचा पालखी सोहळा पाटण तालुक्यातील कावदरा येथे पोहचल्यानंतर हजारो भाविकांनी येथे निसर्ग पूजन करून येळकोट येळकोट जयमल्हार व जानूबाईच्या नावाने चांगभलेचा जयघोष केला.

जेजुरी नगरची ग्रामदेवता जानाई देवीचा जेजुरी ते सातारा जिल्ह्यातील निवकने पालखी सोहळा सुरू असून गुरुवारी पाटण तालुक्यातील तारळे येथून पहाटे पालखी सोहळा कावदरा येथील पठारावर पोहचला. कावदरा हा दरी डोंगर खोऱ्याचे पठार असून निसर्ग सौंदर्याने नटलेला भाग आहे. पालखी सोहळा या कावदरा येथे पोहचल्यावर जानाई देवीचे परडी पूजन करण्यात आले. समाज आरतीनंतर हजारो जानाई भक्तांनी परंपरेनुसार निसर्गाचे पूजन करून ओटी भरण व श्रीफळ अर्पण केले.

# उरुळी कांचन परिसरात गुंडगिरीत वाढ!

## तिघांनी केला तरुणावर कोयत्याने प्राणघातक हल्ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** तिघांनी एका ३२ वर्षीय तरुणावर ऊस तोडण्याच्या कोयत्याने प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली आहे. उरुळी कांचन ग्रामपंचायत हद्दीतील शिंदवणे- उरुळी कांचन रोडवरील चिंतामणी वॉशिंग सेंटर जवळ बुधवारी (ता. ५) सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. निखिल एकनाथ खेडेकर (वय ३२, धंदा खाजगी नोकरी रा. शिंदवणे खेडेकर आळी, ता. हवेली) असे या जीवघेण्या हल्ल्यात जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. खेडेकर यांनी दिलेल्या



तक्रारीनुसार दुचाकीवरून आलेल्या तिघांवर उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उरुळी कांचन परिसरात दहशत, गुंडगिरी, दादागिरी, कोयतेगिरीत,छेडछाड, बुलेट फटाका आवाज अशा प्रकारात वाढ झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. असे प्रकार सातत्याने घडत राहिले तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न डोके तर वर काढणार नाही ना ? असा सवाल उपस्थित झाला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी निखिल खेडेकर व त्यांचा मित्र सतीश चंद्रकांत वाघमोडे (रा. शिंदवणे) हे दोघेजण बुधवारी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास मोटार सायकलवरून शिंदवणे येथून उरुळी कांचन कडे निघाले होते. यावेळी शिंदवणे बाजूकडून अज्ञात तिघेजण हे दुचाकीवर पाठीमागून आले यातील मध्यभागी बसलेल्या इसमाने निखिल खेडेकर याच्या डोक्यात ऊस तोडणीचे कोयत्याने हल्ला केला. दरम्यान, या हल्ल्यात निखिल खेडेकर हा जखमी झाला. तर मोटार सायकलवरील तिघांपैकी एकाने फिर्यादी खेडेकर याला शिविगाळ करुन त्यांच्या ताब्यातील मोटार सायकलसह निघून गेले. या प्रकरणी जखमी खेडेकर यांनी अज्ञात तिघांविरुद्ध उरुळी कांचन पोलिसांत फिर्याद दिली असून आरोपीं विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## यात्रेतील अनाठायी खर्चातून सामाजिक उपक्रम गरजेचे



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** सध्या यात्रेचा हंगाम सुरु झालेला असून, यात्रेमध्ये मोठमोठे तमाशे, फ्लेक्सबाजी, फटाक्यांची आतषबाजी, डीजेचा वापात यांसारख्या बाबींमध्ये अनाठायी खर्च होत असून, अशा यात्रेतील अनाठायी खर्चातून सामाजिक उपक्रम राबवणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांनी केले आहे.

शिक्रापूर पोलीस स्टेशनच्या वतीने पोलीस स्टेशन हद्दीतील गावांमध्ये यात्रेतील अनाठायी खर्च टळून गावामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवून सामाजिक उपक्रम राबवण्याचे आवाहन पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांनी केले आहे. जातेगाव खुर्द गावातील यात्रा उत्सव काळामध्ये यात्रा कमिटीने यात्रेतील अनाठायी खर्च टाळून गावाच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवत पोलिसांच्या आवाहनाला प्रतिसाद दिल्याने पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांनी यात्रा कमिटीचा सन्मान केला. यावेळी सरपंच मोनिका मासळकर, उपसरपंच अतिश निकाळजे, यात्रा कमिटी अध्यक्ष महेश मासळकर, सचिव राम नवगिरे, पोलिस पाटील किसन गजरे, माजी सरपंच मच्छिंद्र मासळकर, माजी उपसरपंच विकास मासळकर, महेश मासळकर, समीर खंडाळे, चेअरमन गणेश रतन मासळकर, पोलीस हवालदार संदीप कारंडे यांसह आदी उपस्थित होते.

## खंडाळेत तीस वर्षांनी भरला पुन्हा वर्ग

**शिक्रापूर :** खंडाळे, ता. शिरुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत १९९३ ते १९९४ काळामध्ये प्राथमिक शिक्षण घेऊन पुढील शिक्षणासाठी शाळेतील बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांचा माजी विद्यार्थी मेळावा नुकताच संपन्न झाल्याने खंडाळेत तीस वर्षांनी पुन्हा वर्ग भरल्याचे दिसून आले आहे.

खंडाळे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत १९९३ ते १९९४ काळामध्ये प्राथमिक शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांचा माजी विद्यार्थी मेळावा नुकताच संपन्न झाला, यावेळी माजी जेष्ठ



खंडाळे ता. शिरुर येथे याब्बळ तीस वर्षांनी एकत्र आलेले माजी विद्यार्थी.

शिक्षक गुलाब आबनावे, बबन दिघे, संपत इसवे, लक्ष्मण जगताप, सर्जेराव काळकुटे हे उपस्थित होते, दरम्यान दिवंगत शिक्षक व माजी विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करत सर्व शिक्षकांना भेटवस्तू देत माजी विद्यार्थ्याच्या वतीने सन्मान करण्यात आला, सदर माजी विद्यार्थी मेळावा यशस्वी होण्यासाठी माजी विद्यार्थी संदिप दरवडे, संदिप हिंगे, राजु नरवडे, प्रल्हाद आबनावे, महेश दरवडे, सविता नरवडे, ललिता नळकांडे, सुरेखा दरवडे, नंदा दरवडे, वंदना खेडकर यांनी विशेष परिश्रम घेतले तर यावेळी तब्बल तीस वर्षांनी एकत्र आल्याने अनेकांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला असून शिक्षकांनी आपले विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत झाल्याचे पाहून समाधान व्यक्त केले, तर माजी विद्यार्थी तथा शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष रमेश नरवडे यांनी सर्वांचे आभार मानले.

## तांदुळाच्या पोत्यात गेलेले दागिने परत मिळवले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** जेजुरी नजीक एका खेडेगावात असलेल्या शेतकरी महिलेचे साडे चार तोळे सोन्याचे दागिने तांदूळ विक्री करताना नजरचुकीने गेले. मात्र, पोलिसांनी तपास करत सोने हस्तगत करून सदरील महिलेला परत केले.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, २४ तारखेला जेजुरी नजिक निळूंज गावातील शेतकरी महिला स्मिता संतोष जगताप यांनी आपल्या घरातील तांदळाचे पोते एका व्यापा-याला विकले. या पोत्यामध्ये त्यांनी सुमारे साडेचार तोळे असलेले दागिने एका प्लास्टिकच्या डबीत ठेवले होते. व्यापाऱ्याला तांदूळ विकताना त्यांच्या हे लक्षात आले नाही. तांदूळ पोते घेऊन व्यापारी निघून गेला. त्याचा नाव, गाव, पत्ता काहीच माहिती नव्हता. दोन दिवसांनी स्मिता जगताप यांना दागिन्यांची आठवण झाली आणि तांदूळ विक्री करताना त्यातच ते गेल्याचे लक्षात आले. या सोन्याचा तपास करणे हे मोठे आव्हान होते. कोणत्याही प्रकारचे सीसीटीव्ही फुटेज नाही, व्यापाऱ्याचा नंबर नाही, ओळख नाही तरी जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली दोन दिवसात खेडोपाड्यातून शेतकऱ्यांकडून तांदूळ विकत घेणारे व्यापारी यांचा शोध लावून सदर महिलेचे सोने परत महिलेला सुपूर्त केले. यावेळी नजरचुकीने गेलेले सोन्याचे दागिने ताब्यात घेताना स्मिता जगताप यांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. सदरची शोध मोहीम जेजुरी पोलीस स्टेशनचे स.पो.नी. दीपक वाकचौरे, पोलीस उपनिरीक्षक सर्जेराव पुजारी, पोलीस हवालदार संदीप भापकर, पोलीस हवालदार मुजावर यांनी केली



जेजुरी पोलिसांनी महिलेचे तांदळाच्या पोत्यातून नजरचुकीने गेलेले चाडे चार तोळे सोन्याचे दागिने परत केले.

## तलवारीने दहशत माजवणाऱ्यावर गुन्हा

**शिक्रापूर :** शिरुर शहरातील हॉजिकॉन कॅरम कॅफे येथे आरबाज शेख हा त्याच्या मित्रांसमवेत बसलेला असताना, नारायण गव्हाणे हा त्याच्या जवळील कारमधून हातात तलवार घेऊन आला. नारायण याने कॅरम कॅफेमध्ये येऊन अरबाज याला तलवारचा धाक दाखवून शिवीगाळ, दमदाटी करत मला ओळखत नाही का, मी इथला भाई आहे, येथे धंदा करायला माझी परवानगी लागते नाहीतर येथे धंदा करायचा नाही असे म्हणत, त्याला जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच कॅफे मधील टेबल खुर्च्या अस्ताव्यस्थ फेकल्या, तलवारीने दहशत निर्माण केली.

**दौंड नगरपरिषद, दौंड, जिल्हा-पुणे**
**'ब' वर्ग नगरपरिषद**
नगरपरिषद टाऊन हॉल व कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, दौंड, पुणे-४१३८०१.
Email ID : - doundmc@gmail.com दूरध्वनी: ०२११७ - २९५१९७

जा.क्रं. दौनप/पा.पु./३६०/२०२५ दि: ०७/०३/२०२५

**पाणीपुरवठा विभाग दौंड नगरपरिषद दौंड**

मा. मुख्याधिकारी, नगरपरिषद दौंड यांच्याकडून मैलापाणी केंद्रासाठी प्रेशर फिल्टर बसविणेकरीता आवश्यक सहित्याचे दर अंदाजपत्रक बनविणे कामी मागविणे आहे. तरी विहित नमुन्यातील दरपत्रक नगरपरिषद दौंड कार्यालयात दिनांक १०/०३ /२०२५ सकाळी ११.०० ते दि. १७ /०३ /२०२५ पर्यंत सादर करावे.

शिक्का
सही/-
**मुख्याधिकारी**
**दौंड नगरपरिषद, दौंड**

## परसबाग स्पर्धेत चांबळी शाळेचा प्रथम क्रमांक



कौतुकास्पद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** शालेय पोषण शक्ती योजनेअंतर्गत शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शासनामार्फत मध्यान्ह भोजन योजना राबवली जाते या योजनेअंतर्गत सर्व शाळांमधून परसबाग स्पर्धा आयोजित केल्या जातात. या स्पर्धेत पुरंदर तालुक्यात जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा चांबळी शाळेचा प्रथम क्रमांक आला आहे.

शालेय पोषण आहार उत्कृष्टपणे होण्यासाठी चांबळी शाळेच्या आवारात छान व मोठी परसबाग तयार केली आहे. त्यामध्ये विविध पालेभाज्या मेथी, पालक, कोथिंबीर, शापू, करडई, आंबट चुका, चाकवत, लाल माठ, कोबी फ्लॉवर, अळू तसेच फळ भाज्या मध्ये गावरान टोमॅटो, दुधी भोपळा, दोडका, वांगी, काशी भोपळा, तोंडली तसेच कंद भाज्यांमध्ये बटाटा, कांदा, गाजर, मुळा, लसुण व शेंग भाज्यांमध्ये वाटाणा, पावटा, वाल, डफळ, तुर, घेवडा, काबुली हरभरा ,हिरवी मिरची ही पिके घेतली आहेत. परसबागेतील सर्व पिके सेंद्रिय पद्धतीने पिकविली जातात. या सर्व पिकांचा भाज्यांचा शालेय पोषण आहारात उपयोग केला जातो.

सर्व विद्यार्थी आनंदाने परस बागेत श्रमदान करतात व त्यांनी पिकवलेल्या भाज्या पोषण आहारामध्ये आनंदाने खातात. त्यातून विद्यार्थ्यांना विविध प्रकारची विटामिन्स, प्रोटीन्स जीवनसत्वे मिळतात व विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले राहून पोषण चांगले होते. विद्यार्थी सुदृढ राहतात. पुढील वर्षासाठी कांदा, लसूण याचे भरघोस उत्पन्न मिळून त्यांची साठवणूक करण्यात आली. पुढील वर्षीही नियमित वापर करता येणार आहे. विद्यार्थी पालेभाज्या व फळभाज्यांची विक्री गाव पातळीवर करतात. त्या आलेल्या पैशातून मुलांना पौष्टिक आहार विकत घेऊन दिला जातो. विक्रीतून मुलांना व्यवहारी ज्ञानाची माहितीही होते. पुढील वर्षी साठी बीज बँक देखील करण्यात आली आहे. सदर प्रसंगी पुरंदर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी संजय जाधव, शालेय पोषण आहार अधीक्षक बिलवाल मॅडम, राजेवाडी बीटचे विस्ताराधिकारी व चांबळी केंद्राचे केंद्रप्रमुख प्रताप मेमाणे, चांबळी गावच्या सरपंच प्रतिभाताई कदम, व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य, दीपक पाटील यांनी शाळे चे मुख्याध्यापक शोभा कामथे, उपशिक्षक मोहन जगताप, भारती कावडे, सपना घम, जयमाला कुदळे व विद्यार्थी, मनीषा पवार या सर्वांचे अभिनंदन केले.

**दौंड नगरपरिषद, दौंड, जिल्हा-पुणे**
**'ब' वर्ग नगरपरिषद**
नगरपरिषद टाऊन हॉल व कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, दौंड, पुणे-४१३८०१.
Email ID : - doundmc@gmail.com दूरध्वनी: ०२११७ - २९५१९७

जा.क्रं. दौनप/पा.पु./३६०/२०२५ दि: ०७/०३/२०२५

**पाणीपुरवठा विभाग दौंड नगरपरिषद दौंड**

मा. मुख्याधिकारी, नगरपरिषद दौंड यांच्याकडून जुने व नविन जलशुद्धीकरण केंद्रासाठी व्ही वायर करणेकरीता आवश्यक सहित्याचे दर अंदाजपत्रक बनविणे कामी मागविणे आहे. तरी विहित नमुन्यातील दरपत्रक नगरपरिषद दौंड कार्यालयात दिनांक १०/०३ /२०२५ सकाळी ११.०० ते दि. १७ /०३ /२०२५ पर्यंत सादर करावे.

शिक्का
सही/-
**मुख्याधिकारी**
**दौंड नगरपरिषद, दौंड**

**At a Glance**

### समीर वानखेडे यांची बदली रद्द

**मुंबई :** कॉर्डेलिया क्रूझ रेव्ह पार्टी प्रकरणात वादग्रस्त ठरलेल्या समीर वानखेडे यांची चेन्नईला झालेली बदली कॅटने अर्थात केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरणाने रद्द केली आहे. यावेळी वानखेडे यांच्याविषयीची भूमिका पक्षपातीपणाची असल्याची टीकाही कॅटने केली. कॅटचे अध्यक्ष न्या. रणजित मोरे आणि सदस्य-अ राजिंदर कश्यप यांच्या पीठाने हा निर्णय दिला आहे.

महसूल विभागाने समीर वानखेडे यांची मे २०२२ मध्ये मुंबईहून चेन्नईला बदली केली होती. महसूल विभागाचा हा आदेश मनमानीपणाचा आणि स्वत:च्या विभागाच्या बदलीच्या धोरणाचा उल्लंघन करणारा असल्याचे न्यायाधीकरणाने म्हटले आहे. बदलीपूर्वी वानखेडे मुंबईमध्ये एनसीबीचे विभागीय संचालक होते. त्यावेळी कॉर्डेलिया क्रूझवर रेव्ह पार्टी सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी छापेमारी केली होती. या छाप्यात अभिनेता शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान याला अमली पदार्थ बाळगल्याच्या आरोपाखाली अटक केली होती. त्यानंतर त्याच्या कुटुंबाकडून २५ कोटी रुपयांची लाच मागितल्याचा आरोप करण्यात आला होता.

यामुळे वानखेडे यांना या प्रकरणाच्या चौकशीतून हटविण्यात आले होते. त्यानंतर ३० मे २०२२ रोजी त्यांची चेन्नईला बदली करण्यात आली होती. पण आता हा बदली आदेश मनमानीपणाचा आणि स्वत:च्या विभागाच्या बदलीच्या धोरणाचा उल्लंघन करणारा असल्याचे न्यायाधीकरणाने म्हणत कॅट बदली रद्द केली आहे.

# जपानमध्ये शिवरायांचे स्मारक

## आज स्मारकाचे उद्‌घाटन योगेंद्र पुराणिक यांचे सहकार्य



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जपान मधील टोकियो शहरात उभारले जाणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे उद्‌घाटन आज दिनांक ८ मार्च रोजी होणार आहे. कार्यक्रमाला राज्याचे उद्योग जपान मधील टोकियो शहरात उभारले जाणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे उद्‌घाटन आज दिनांक ८ मार्च रोजी होणार आहे. कार्यक्रमाला राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, श्री गोविंदगिरीजी महाराज, आम्ही पुणेकर संस्थेचे अध्यक्ष हेमंत जाधव, जपानचे मंत्री, टोकियो शहराचे महापौर यावेळी उपस्थित राहणार आहेत.

जपानचे माजी आमदार व यदुगोवा कल्चरल सेंटरचे अध्यक्ष योगेंद्र पुराणिक यांचे सहकार्य स्मारकासाठी मिळाले आहे.

"छत्रपती शिवाजी महाराज यांचा हा पुतळा ८ फुटी आहे. ज्येष्ठ शिल्पकार विवेक खटावकर यांनी हा पुतळा तयार केला. जपानच्या भौगोलिक रचनेमुळे तिथे नेहमी भूकंप तसंच सुनामी येत असते. या सर्व बाबी लक्षात घेऊन हे स्मारक बनविले आहे. पुढील १०० वर्ष या स्मारकाला काहीही होणार नाही,"

टोकियो येथे उभारला जाणारा छत्रपती शिवाजी महाराज यांचा हा पुतळा पुणे येथील ज्येष्ठ शिल्पकार विवेक खटावकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिल्पकार विपुल आणि विराज खटावकर यांनी साकारला आहे. हा पुतळा प्लास्टिकपासून तयार करण्यात आला असून वजनाने हलका असून भूकंप प्रवण क्षेत्रात देखील हा पुतळा दिमाखदारपणे टिकाव धरणार आहे.



" जपानमधील या स्मारकाचे मुख्य आकर्षण हे शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा, महाराष्ट्रातील विविध गड किल्ल्यांच्या प्रतिकृती आणि इतिहासातील मौल्यवान साधनांचा संग्रह असलेले संग्रहालय आहे. लोकवर्गणीतून उभारण्यात येणारे परदेशातील हे पहिले स्मारक आहे. या स्मारकाच्या निमित्ताने जपानमध्ये राहणाऱ्या भारतीय वंशाच्या लोकांना एकत्र करण्यात आले असून मराठ्यांच्या इतिहासाची ओळख जपानी लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी एक विशेष अध्यासन केंद्राची स्थापना केली जाणार आहे. या अध्यासन केंद्राद्वारे मराठी भाषा आणि मराठ्यांचा इतिहास याचा प्रचार होईल. तसेच महाराष्ट्रातील गड किल्ल्यांच्या पर्यटन उद्योगाला देखील या निमित्ताने चालना मिळणार आहे.

— हेमंत जाधव

### महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याची वैशिष्ट्ये

- छत्रपती शिवाजी महाराज यांचा हा पुतळा ८ फुटी आहे.
- ज्येष्ठ शिल्पकार विवेक खटावकर यांनी हा पुतळा तयार केला.
- भूकंप व सुनामी रक्षण होईल असे स्मारक बनविले आहे.
- पुढील १०० वर्ष या स्मारकाला काहीही होणार नाही.
- टोकियोतील हा पुतळा प्लास्टिकपासून तयार करण्यात आला
- वजनाने हलका व देखणा पुतळा सर्वांचे लक्षवेधी ठरणार.

### महत्त्वाकांक्षी उपक्रम

- व्यावसायिक शिक्षणाच्या दृष्टीने जपानी विद्यापीठांबरोबर प्राथमिक स्तरावर चर्चा सुरू असून या सहकार्यातून महाराष्ट्रातील तरुणांसाठी जपानमधील रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. हे स्मारक केवळ एक प्रतीक नसून भारतीय व जपानी नागरिकांमधील सांस्कृतिक आणि शैक्षणिक संबंधांना नवीन उंचीवर नेण्याचा एक महत्त्वकांक्षी उपक्रम ठरणार आहे.

# राज्यातील शाळांच्या वार्षिक परीक्षा लांबल्या!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यभरातील सर्व शाळांच्या वार्षिक परीक्षांसाठी शिक्षण विभागाने वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. यावर्षीच्या परीक्षा २५ एप्रिल पर्यंत चालणार असल्याने पालक व शिक्षकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. वार्षिक परीक्षेचे वेळापत्रक बदलण्याची मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाने केली आहे.

दरवर्षी प्राथमिक, माध्यमिक शाळा परीक्षा एप्रिलच्या पहिल्या आठवड्यामध्ये होत असतात. १५ एप्रिल पर्यंत परीक्षांचे कामकाज पूर्ण होऊन पुढील पंधरवड्यात वार्षिक निकाल पत्रिक तयार करून १ मे ला निकाल जाहीर केला जातो. मात्र या वर्षाच्या उशिरा होणा-या परीक्षेमुळे शिक्षकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष बाळासाहेब मारणे यांनी याबाबत अधिक माहिती दिली.

राज्याध्यक्ष मारणे म्हणाले, राज्य शासनाच्या शिक्षण विभागाने राज्यभरातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांसाठी वार्षिक परीक्षांमध्ये एक वाक्यता राहावी. तसेच एप्रिलमध्ये मुलांची उपस्थिती राहण्यासाठी वार्षिक परीक्षांचे वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. एप्रिल अखेरपर्यंत हे परीक्षा सुरू राहणार असल्याने या वेळापत्रकावर पालक व शिक्षकांनी आक्षेप घेतला आहे. वार्षिक परीक्षेसोबतच, संकलित मूल्यमापन २, पॅट चाचणीचे आयोजन करण्याच्या सूचना आहेत. ही परीक्षा ३ री ते ९ वीच्या वर्गासाठी आहे. पॅट परीक्षा मराठी, इंग्रजी व गणित या विषयासाठी घेतली जाते. त्याचबरोबर पाचवी ते आठवी या मुलांसाठी वार्षिक परीक्षा घेण्यात आली आहे.

शिक्षण आयुक्तालयाच्या परिपत्रकातील वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा पार पाडल्यास शेवटचा पेपर २५ एप्रिल रोजी आहे. त्यानंतर निकालापर्यंत फक्त चार ते पाच दिवसांचा कालावधी उपलब्ध आहे. जास्त विद्यार्थी संख्या असणा-या शाळांमध्ये निकालाच्या कामासाठी खूप कमी कालावधी मिळत आहे.

### १ मे रोजी निकाल कसा जाहीर करणार?

- अशा परिस्थितीत १ मे रोजी निकाल कसा जाहीर करणार असा प्रश्न शिक्षकांपुढे आहे. ऐन उन्हाळ्यात मुलांचे हाल होण्याची चिन्हे आहेत. १५ एप्रिल नंतरचा प्रचंड उकाडा, बाहेरगावी जाणारे पालक, ग्रामीण भागातील यात्रांचा हंगाम यामुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती ठेवण्यासाठी शिक्षकांची धावाधाव होणार असून अनेक मुले उष्णतेमुळे आजारी पडण्याच्या भीतीने पालकांनी या अघोरी शिक्षणावर संताप व्यक्त केला आहे.

### परीक्षेनंतर शिक्षकांची कामे


- वार्षिक परिक्षेनंतर शिक्षकांना पेपर तपासणी, संकलित मूल्यमापन नोंदवही पूर्ण करणे, पॅट परीक्षेचे गुण ऑनलाइन चॅटबोटवर भरणे, निकाल पत्रकांना मंजुरी घेणे यासारखी कामे करावी लागतात.

# धारावी प्रकल्प स्थगितीस 'सर्वोच्च' नकार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या (डीआरपी) सुरू असलेल्या बांधकामाला स्थगिती देण्यास नकार दिला. तसेच, मुंबई उच्च न्यायालयाने अदानी समूहाच्या बाजूने दिलेला निर्णयही पलटण्यास नकार दर्शवला.

यूएई स्थित सेकलिंक टेक्नॉलॉजीज कॉर्पोरेशनने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने म्हटले की, प्रस्तुत प्रकल्पाचे काम आधीच सुरू झाले आहे, ज्यामध्ये काही रेल्वे क्वार्टर पाडण्याचा समावेश आहे.



### पुढील सुनावणी २५ मे रोजी

- पुढील सुनावणी २५ मे रोजी होईल. धारावी प्रकल्पासाठी सुरुवातीला ७२०० कोटी रुपयांची बोली लावणा-या सेकलिंक टेक्नॉलॉजीजने सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, ते त्यांची बोली २० टक्क्यांनी वाढवण्यास तयार आहेत. त्यावर खंडपीठाने सेकलिंकला त्यांच्या सुधारित बोलीची माहिती देणारे प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश दिले.

सेकलिंकने मागील बोली नाकारल्यानंतर धारावी प्रकल्प अदानी प्रॉपर्टीज लिमिटेडला देण्याच्या महाराष्ट्र सरकारच्या निर्णयाला आव्हान दिले होते.

कंपनी म्हणाली बोली २० टक्क्यांनी वाढवण्यास तयार सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती पीव्ही संजय कुमार यांच्या खंडपीठाने म्हटले- मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय योग्य होता, कारण रेल्वे मार्गाचा विकास करून त्याचा या प्रकल्पात समाविष्ट केला जाईल. न्यायालयाने महाराष्ट्र सरकार आणि अदानी प्रॉपर्टीजना नोटीस बजावून उत्तर मागितले आहे.

# सांगलीत शिवशाहीत मुलीचा विनयभंग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सांगली :** पुण्यातील स्वारगेट बसस्थानकात शिवशाहीमध्ये एका तरूणीवर बलात्कार झाल्याची घटना ताजी असतानाच सांगलीमध्ये एका शिवशाहीमध्ये तरूणीची छेड काढल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे.

या छेडछाड प्रकरणी सांगली शहर पोलिस ठाण्यात संशयित आरोपी मयूर कांबळे याच्या विरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वैभव कांबळे, असे या संशयित तरुणाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुण्याहून सांगलीला एक तरुणी शिवशाही बसमधून येत होती. यावेळी आष्टा परिसरात संशयीत आरोपी मयूर कांबळेने तरूणीची छेड काढून तिचा विनयभंद केला. या घटनेनंतर सदर तरुणी ही भयभीत झाली. त्यानंतर सांगली बस स्थानकात गाडी पोहचताचं तरुणीने घडलेला सर्व प्रकार बस चालक आणि वाहकाला सांगितला.यावेळी संशयित मयूर कांबळेने पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रवाशांनी त्याला पकडून आधी चोप दिला आणि त्यानंतर त्याला शहर पोलिसांत घेऊन गेले. सांगली शहर पोलिस ठाण्यात मयूर कांबळेच्या विरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिस निरीक्षक संजय मोरे यांनी दिली. ते म्हणाले, गुरूवारी मध्यरात्री १२ च्या सुमारास बस स्थानकावर महिला रडत थांबल्याचे निदर्शनास आले.



### आरोपीस १५ दिवसांची न्यायालयीन कोठडी

- पोलिसांनी त्या महिलेला विचारपूस केली असता तिने घडलेला प्रकार सर्व सांगितला आणि पोलिसांनी त्या आरोपीस तात्काळ अटक केली. त्यानंतर न्यायालयासमोर हजर केल्यानंतर त्याला १५ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.


**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत ही विद्यमान मालक **सौ. स्मिता सुर्यकांत वाळके, रा. अग्रवाल बिल्डींग, देना बँकेजवळ, भोसरी पुणे** – ३९ यांचे मालकी हक्काची व ताबे वहिवाटीची मिळकत असुन सदरची मिळकत आमचे अशिलांना कायमखुष खरेदी देण्याच्या व्यवहाराची पुर्ण बोलणी झालेली आहे. तसेच सदरची मिळकत संपुर्णपणे निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याचा भरवसा आमचे अशिल यांना दिलेला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, ताबा, बोजा, वहिवाट, खरेदीविक्री, गहाण, दान, लिज, लीन, बक्षीस, करार अथवा पोटगी किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा (१५) दिवसांचे आत आमच्या वरील पत्त्यावर अस्सल कागदपत्रे घेवुन येवुन आमची खात्री पटवुन द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही व कसलीही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध नाही व असल्यास तो जाणीवपूर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिला आहे असे समजून सदर मिळकत ही पुर्णपणे निर्वेध, निजोखमी व बोजारहीत आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदर मिळकतीचा पुढील व्यवहार पूर्ण करतील व नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही व नंतर होणाऱ्या परिणामांस आमचे अशिल जबाबदार रहाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

**मिळकतीचे वर्णन :** तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका हवेली मे सब रजिस्ट्रार हवेली, पुणे यांचे कार्यक्षेत्रातील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे हद्दीतील मिळकत गाव मौजे भोसरी येथील मिळकती खालीलप्रमाणे :

अ) गाव मौजे भोसरी येथील मिळकत यांसी स.नं. ६९०, हिस्सा नं. १अ/१/१, मिळकत नं. १०/०३/०००१५ मधील लिहुन देणार यांच्या मालकीची १२ फुट X १२ फुट या मोजमापाच्या बांधकाम केलेल्या दोन रूम व यांसी क्षेत्र २८८ चौ. फुट व त्यापुढील गटार सोडुन ११ फुट X १२ फुट या मोजमापाची मोकळी जागा ही मिळकत यांसी चतुः सिमा : **पुर्वेस : नाशिक हायवे, दक्षिणेस : श्री. पाचांग्रे गोपीनाथ यांची मिळकत, पश्चिमेस : प्रमिला मारुती कंद यांची मिळकत, उत्तरेस : हिम्मतराव चव्हाण यांची मिळकत.**

ब) गाव मौजे भोसरी येथील मिळकत यांसी स.नं. ६९०, हिस्सा नं. १अ/१/८ यांसी सिटीएस नं. ४५६३ या मिळकतीवर आरसीसीमध्ये बांधकाम केलेल्या इमारतीतील २ डबल रूम यांसी क्षेत्र २४ फुट X २१ फुट पैकी १५ फुट X १२ फुट म्हणजेच १८० चौ. फुट म्हणजेच १६.७२ चौ.मी. मोजमापातील एक रूम व त्यापुढील मोकळी जागा म्हणजेच १४४ चौ. फुट म्हणजेच १३.३८ चौ. फुट यांसी मिळकत क्र. ००४२४ ही मिळकत यांसी चतुः सिमा : **पुर्वेस नाशिक हायवे, दक्षिणेस : श्री. पाचांग्रे गोपीनाथ यांची मिळकत, पश्चिमेस : प्रमिला मारुती कंद यांची मिळकत, उत्तरेस : हिम्मतराव चव्हाण यांची मिळकत.**

येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

पुणे
दिनांक : ०६/०३/२०२५

**वैशाली भुषण बडगुजर**
B.A.LLB
ऑफिस नं. १४, पार्वती हाईटस्
दत्त मंदिर समोर, लांडेवाडी, भोसरी
पुणे – ४११०३९
मो. नं. ९६७३२८७४३०/९३७००४१४७०


# रखडलेल्या पुलाच्या कामाकडे वेधले सरकारचे लक्ष

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** चिंचवड-थेरगाव दरम्यानच्या बटरफ्लाय ब्रिजच्या कामातील कथित गैरव्यवहारावर आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला. सदर पुलाच्या कामात मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप करत त्यांनी संबंधित ठेकेदार, सल्लागार आणि महानगरपालिका अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली. २०१७ मध्ये २८.७१ कोटींच्या निविदेने कामाला सुरुवात केली.

थेरगाव येथील प्रसून धाम हाउसिंग सोसायटीजवळून चिंचवड-थेरगाव जोडणाऱ्या बटरफ्लाय ब्रिजच्या कामासाठी २०१७ साली धनेश्वर कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराला २८ कोटी ७१ लाख रुपयांची निविदा मंजूर करण्यात आली. विशेष म्हणजे ही निविदा मूळ अंदाजपत्रकाच्या १४% अधिक दराने मंजूर करण्यात आली होती. मूळ निविदेनुसार ठेकेदाराला १८ महिन्यांत काम पूर्ण करणे बंधनकारक होते. मात्र, वेळेत काम न झाल्याने ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. तरीही काम अपूर्ण राहिल्याने सप्टेंबर २०२४ पर्यंतची दुसरी मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र, काम पूर्ण न झाल्याने २६ जानेवारी २०२५ पर्यंत पुन्हा मुदतवाढ देण्यात आली आहे.प्रकरणात ठेकेदार, कन्सल्टंट आणि संबंधित अधिकारी यांच्यात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप होत आहे. केली. सखोल चौकशी व दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे

# घुसखोरांकडून सरकारी योजनेचा लाभ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** देशभरात अवैधरित्या भारतात घुसलेल्या बांगलादेशी नागरिकांविरुद्ध कारवाई सुरु करण्यात आली आहे. अशातच भाजप नेते किरीट सोमय्या यांचा बांगलादेशीच्या शोधाचा मोर्चा आता मालेगावनंतर नाशिककडे वळला आहे. नाशिकच्या कळवणमध्ये पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेमध्ये बांगलादेशी लाभार्थी असल्याचा संशय भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला आहे. या योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये १८१ बांगलादेशी असल्याचा दावा किरीट सोमय्या यांनी केला आहे.

याच पार्श्वभूमीवर किरीट सोमय्या हे कळवण कृषी कार्यालय आणि पोलिस ठाण्याला भेट देणार आहेत. यावेळी नाशिकच्या पोलिस महानिरीक्षकांचीही ते भेट घेणार आहेत. नाशिकच्या कळवळ येथे पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनेमध्ये १८१ बोगस लाभार्थी बांगलादेशी असल्याचा दावा किरीट सोमय्या यांनी केला. किरीट सोमय्या यांनी एक्स पोस्ट करत याची माहिती दिली. आता बांगलादेशी लाभार्थी? आज कळवण आणि नाशिक दौरा गाव भादवण, तालुका कळवण, जिल्हा नाशिक येथे प्रधानमंत्री किसान सम्मान निधि योजना मध्ये १८१ बोगस बांगलादेशी लाभार्थी, असे किरीट सोमय्या यांनी म्हटले. यासह किरीट सोमय्या यांनी बोगस लाभार्थ्यांची यादीदेखील पोस्ट केली आहे.



### काय आहे प्रकरण

- मौजे भादवण येथे १८१ बोगस लाभार्थी निर्दशनास आले असून ते सर्व मुस्लीम समाजाचे आहेत. भादवण गावात आजपर्यंत एकही मुस्लिम कुटुंब अस्तित्वात नाही. तसेच यादीतील १८१ लाभार्थ्यांचा भादवण गावाशी संबंध नाही. एवढ्या मोठ्या प्रमाणात बोगस लाभार्थी प्रधानमंत्री किसान सम्मान निधी योजनेचा लाभ घेत आहेत. याची सखोल चौकशी करुन कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी किरीट सोमय्या यांनी पत्राद्वारे केली आहे.

## राजे शिवराय प्रतिष्ठान, कर्वेनगर तर्फे पुरस्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** देशाच्या रक्षणार्थ वीरमरण पत्करलेले भारतीय लष्करातील जवान हुतात्मा अमर पवार यांना नरवीर सुभेदार तानाजी मालुसरे पुरस्कार आणि शिक्षण व आरोग्य क्षेत्रात काम करणा-या सेवा आरोग्य फाऊंडेशनला स्व. ज्ञानेश पुरंदरे यांच्या स्मृती प्रित्यर्थ ज्ञानेश सेवा समर्पण पुरस्कार कर्वेनगरमधील राजे शिवराय प्रतिष्ठानतर्फे प्रदान करण्यात येणार आहे. शिवजयंती उत्सवाच्या निमित्ताने रविवार, दिनांक ९ मार्च रोजी सायंकाळी ६.३० वाजता जय शिवराय चौक, कर्वेनगर येथे पुरस्कार वितरण होईल, अशी माहिती प्रतिष्ठानचे संस्थापक महेश पवळे यांनी दिली.

# औरंगजेबाची कबर उखडून टाका : छत्रपती उदयनराजे

**एका क्रूर व्यक्तीच्या सध्या काहींजणांकडून त्याचा गौरव होतो, त्याच्या कबरीचे उदात्तीकरण, दैवतीकरण सुरू आहे. त्याचे इथे उरूस भरवले जात आहेत. हे सगळे महाराष्ट्राच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. हे प्रकार कायमचे रोखण्यासाठी औरंगजेबाची ही कबरच महाराष्ट्रातून उखडून टाकली पाहिजे असे मत उदयनराजे यांनी व्यक्त केले. दरम्यान महापुरुषांविषयी वादग्रस्त वक्तव्ये करणाऱ्याविरोधात तातडीने कायदा करण्याच्या मागणीचाही उदयनराजे यांनी पुनरुच्चार केला.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सातारा :** औरंगजेब हा धर्मांध, क्रूर शासक आणि या देशाचा लुटारू होता. छत्रपती शिवाजी महाराजांना त्रास देणाऱ्या, छत्रपती संभाजी महाराजांची अत्यंत निर्दयीपणे हत्या करणाऱ्या या औरंगजेबाच्या कबरीचे या महाराष्ट्रात उदात्तीकरण, दैवतीकरण सुरू आहे. त्याचे इथे उरूस भरवले जात आहेत हे आमच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. हे प्रकार कायमचे रोखण्यासाठी औरंगजेबाची ही कबरच उखडून टाकली पाहिजे, असे मत छत्रपती शिवाजी महाराजांचे तेरावे वंशज आणि खासदार उदयनराजे भोसले यांनी साताऱ्यात माध्यमांशी बोलताना व्यक्त केले आहे.



अबू आझमी यांनी औरंगजेब याचे उत्तम प्रशासक असा गौरव केल्यानंतर राज्यात या वक्तव्याविरुद्ध पडसाद उमटत आहेत. हे वक्तव्याचा निषेध सुरू असतानाच औरंगजेब याच्या नावाने भरवल्या जाणाऱ्या उरुसाची चर्चाही सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर उदयनराजे माध्यमांशी बोलत होते. औरंगजेबाचे पूर्वज हे बाहेरून आलेले लुटारू, धर्मांध आणि आक्रमक असल्याचे सांगत उदयनराजे म्हणाले, की या औरंगजेबाने या देशातील प्रत्येक राजवटींना त्रास दिला, रयतेवर अत्याचार केले. धर्मांतरे घडवली. स्वतःच्या राजकीय महत्वकांक्षेतून सख्ख्या भावांची त्याने हत्या केली, वडलांना कैदेत टाकले, इथली मंदिरे, देवांवर त्याने हल्ले केले, आमची संस्कृती नष्ट करण्याचा त्याने प्रयत्न केला. तो आणि त्याचे पूर्वज हे फक्त हा देश लुटण्यासाठी आले होते. त्यांनी इथला देव, देश आणि धर्म बुडवण्याचे काम केले. असा हा माणूस आमच्यासाठी आदर्श कसा होऊ शकतो? छत्रपती शिवाजी महाराजांना ज्याने त्रास दिला, त्यांचा अपमान केला. छत्रपती संभाजी महाराजांची ज्याने अत्यंत निर्दयीपणे हत्या केली. असे असताना या क्रूरकर्मा औरंगजेबाची कबर या महाराष्ट्रात कशाला हवी.

" औरंगजेब आमच्या देशाचा, स्वराज्याचा, आमच्या राजांचा हा शत्रू होता. ज्यांचे कुणाचे औरंगजेबावर प्रेम असेल, त्याने ही कबर घेत औरंगजेब, त्याचे पूर्वज जिथून आले तिथे चालते व्हावे. औरंगजेबाचा गौरव करणाऱ्या पिलावळीने हे प्रकार थांबवावेत. "
—छत्रपती उदयनराजे, खासदार


**PUBLIC NOTICE**

Known all men by this present that my client **i.e. Mr. Harsh Shrikant Kulkarni, Mrs. Ulkkah Shrikant Kulkarni and Mr. Shrikant Vasant Kulkarni** desirous to purchase the **Flat No. B104**, admeasuring about **750 Sq. Ft. means 69.70 Sq. Mtrs. Built up**, on **First Floor** of **Building B** alongwith **Car Parking No. 6** admeasuring **133.56 Sq. Ft means 14.89 Sq. Mtrs** on **Ground Floor** in the society known as of **Sadichha Co-op. Hsg. Society Ltd.,** constructed on **CTS No. 1127, S. No. 123/A/1/2** situated at **Village Kothrud, Taluka Haveli within District Pune** and within the limits of Pune Municipal Corporation and within the jurisdiction of Sub Registrar Haveli No.1 to 27, Pune from **Mr. Sachin Madhav Joshi**.

**Original 1) Agreement No. HVL4-4321/1999 dated 15/07/1999 and 2) Agreement No. HVL1-3913/2006 dated 12/05/2006 and 3) Assignment No. HVL15-4193/ 2017 dated 06/05/ 2017 alongwith all its Registration Receipt & Index II and Share Certificate** are lost or misplaced.

If any person is possessed the said page/document he may return the said document to the undersigned or if any person having any right, interest, title by way of sale, gift, charge, loan, exchange, etc. shall inform & raise their objection and satisfy me along with documentary evidence within **10 days** from the date of publication of this notice. Thereafter my client will presume that interested party waive rights and complete the transaction of the said property.

**Pune**
**Date: - 08/03/2025**

**MRS. SUCHITA A. SHAH**
ADV. & NOTARY, GOVT. OF INDIA
Office No. 403 A, Mangalmurti Complex, S. No. 309,
Final Plot No. 37A, T P Scheme No. 1, CTS No. 990, Shukrawar Peth, Pune- 411 002.
Contact no:- 9822633383 Mail Id : suchita.amol.shah@gmail.com


"Empowerment of women is essential for the emancipation of mankind."
HAPPY WOMEN'S DAY
Well wishers of
Belrise group of industries
BELRISE INDUSTRIES

# अस्मिता

# गरमागरम पोडी इडली

रसगंधा

इडली हा झटपट होणारा पदार्थ. आज घराघरात इडली बनते. सर्वसाधारणपणे इडली चटणी किंवा इडली सांबार खाल्लं जातं. पण एखाद्या दिवशी बदल म्हणून पोडी इडली बनवू शकता. हा सकाळच्या गडबडीत पटकन होणारा पदार्थ आहे.

**साहित्य :** छोट्या आकाराच्या दहा इडल्या, दोन चमचे शेंगदाणे, दोन मोठे चमचे चणाडाळ, एक मोठा चमचा उडिद डाळ, दोन ते तीन सुक्या लाल मिर्च्या, दोन छोटे चमचे तीळ, दोन छोटे चमचे किसलेलं सुकं खोबरं, अर्धा चमचा जीरं, कढीपत्त्याची सहा-सात पानं, चवीनुसार मीठ आणि तूप



**कृती :** एका कढईत दाणे, लाल मिरची, चणा डाळ, उडीद डाळ, तीळ, सुकं खोबरं, जीरं आणि कढीपत्त्याची पानं घालून मंद आचेवर भाजून घ्या. त्यानंतर गॅस बंद करा. हे पदार्थ थंड झाल्यावर मिक्सरमधून बारीक वाटून घ्या. वाटताना चवीनुसार मीठ घाला. तुमचा पोडी मसाला तयार आहे. आता कढईत थोडं तूप गरम करा. यात इडल्या घालून परतून घ्या. आता या इडलीवर पोडी मसाला भुरभुरा. चमच्याने नीट हलवून घ्या. पोडी इडली तयार आहे.

✦✦✦

# घालमेल कशी थांबवू?

काय करू?

तीन वर्षांपूर्वी माझं लग्न झालं. माझा नवरा महिन्यातले २५ दिवस कामासाठी बाहेर असतो. यामुळे मला खूप एकटं वाटतं. आमच्यातला संवाद खूपच कमी झाला आहे. तो बाहेर गेल्यावर रोज फक्त १०-१५ मिनिटं बोलणं होतं. यामुळे माझी चिडचिड होते. पण त्याच्यावर कामाचा खूप ताण असल्यामुळे तक्रारींची भर पडू नये, असं वाटतं. मी काय करू?

– वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्याचं संतुलन साधण्याची कला प्रत्येकाला जमायला हवी. पण अनेकदा असं संतुलन साधणं कठीण होतं आणि एकच बाजू वरचढ ठरते. पण नात्याला आकार देण्यासाठी एकमेकांसोबत चांगला वेळ घालवणंही गरजेचं आहे. तू पतीला समजून घेऊन परिस्थितीला योग्य पद्धतीने सामोरं जात आहेस. पण तुझी घालमेल पतीला सांगणंही गरजेचं आहे. तुझ्या भावना त्याच्यापर्यंत पोहोचल्याच नाही तर तो स्वत:मध्ये सुधारणा कशी करणार? प्रत्यक्ष बोलायला वेळ नसेल तर तू त्याला मेसेज कर, मेल पाठव. तो परतल्यावर लंच किंवा डिनरच्या निमित्ताने एखाद्या निवांत ठिकाणी जाऊन मोकळ्या गप्पा मारण्याचा बेतही ठरवू शकतेस. बघ, कोणता मार्ग प्रशस्त वाटतो ते...



✦✦✦



# पगारवाढ हवी आहे?

स्कील डेव्हलपमेंट

नोकरी म्हटली की पगारवाढ आलीच. कर्मचाऱ्यांना त्यांच्या कौशल्यांनुसार, क्षमतेनुसार बढती दिली जाते. ठराविक काळानंतर पगारवाढही होते. पण २०१५ च्या एका सर्वेक्षणानुसार ५७ टक्के नोकरदार महिला पगारवाढीसाठी विचारणाच करत नाहीत. पगारवाढ मिळवण्यासाठी नेमकं काय करायला हवं याविषयी...

✻ कंपनीच्या प्रगतीत तुम्ही दिलेल्या योगदानाचा विचार करा. कामाचा दर्जा आणि प्रमाण यांचा ताळमेळ बसवताना अचूकता महत्त्वाची आहे हे लक्षात घ्या.

✻ स्वत:मधली कौशल्यं ओळखा. त्यांची यादी करा. तांत्रिकच नाही तर कामाशी संबंधित इतर कौशल्यंही महत्त्वाची ठरतात. तुमची समर्पक वृत्ती, वेळेत कामं संपवणं, कामाप्रतीची निष्ठा या गोष्टीही महत्त्वाच्या आहेत हे लक्षात ठेवा. आपलं पद, हाताखाली काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिलेलं प्रशिक्षण या बाबींचा विचार करा. पगारवाढीबाबत वाटाघाटी करताना आत्मविश्वास दिसू द्या.

✻ एक कर्मचारी म्हणून स्वत:चं मूल्य जाणून घ्या. पगारवाढीबाबत वरिष्ठांशी चर्चा करण्याआधी बाजारपेठेचा अभ्यास करा. तुमच्या पदावर असणाऱ्यांना किती पगार मिळतो हे जाणून घ्या. त्यानुसार वरिष्ठांशी बोला. आपल्याला किती पगारवाढ हवी याचा निश्चित आकडा आपल्याकडे असायला हवा. तसं नसेल तर आपल्याला वरिष्ठांनी दिलेली पगारवाढ मान्य करावी लागेल.

✻ वरिष्ठांशी वाटाघाटी करण्याआधी पूर्ण तयारी करा. अन्यथा, तुम्ही गोंधळून जाल.

✻ तुम्ही पगारवाढीसाठी वाटाघाटी करत आहात हे लक्षात ठेवा. वरिष्ठ आकडा कमी करण्याचा प्रयत्न करणार. कोणीही पहिल्याच प्रयत्नात भरपूर पगारवाढ देणार नाही. त्यामुळे सुरूवात मोठ्या आकड्याने करा. वाटाघाटींदरम्यान हा आकडा खाली येणार आहे हे लक्षात ठेवा.



# आर्थिक सक्षमीकरणाच्या दिशेने..

मानिनी

**पत्रकार असणाऱ्या सोनल रोचानी यांना समाजासाठी काही तरी करायचं होतं. वंचित, दुर्बल घटकांना त्यांचे हक्क मिळवून द्यायचे होते. कामाच्या निमित्ताने फिरताना त्यांना समाजातल्या विविध घटकांमधली आर्थिक दरी दिसत होती. पण कामाची सुरूवात काही केल्या होत नव्हती. पण एका घटनेने त्यांचं आयुष्यच बदलून टाकलं आणि आदिवासी समाजातल्या महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले.**

सोनल रोचानी यांना फक्त पत्रकारितेच्या क्षेत्रापुरतं मर्यादित रहायचं नव्हतं. पत्रकारितेच्या पलीकडे जाऊन समाजातल्या वंचित, दुर्बल घटकांना मदत करण्याची त्यांची इच्छा होती. सोनल सूरतमध्ये पत्रकार म्हणून कार्यरत होत्या. त्यांना कामानिमित्ताने बरंच हिंडावं लागायचं. या दरम्यान त्यांनी समाजातला विरोधाभास अनुभवला. पण हळहळ व्यक्त करण्याशिवाय त्या दुसरं काही करू शकत नव्हत्या. पण २००५ मधल्या एका घटनेने त्या खूप हादरल्या. या घटनेने त्यांच्या आयुष्याला कलाटणी दिली. त्या बातम्या मिळवण्यासाठी जिल्हा रुग्णालयात जायच्या. असंच एके दिवशी रुग्णालयात आलेल्या एका महिलेने त्यांच्याकडे मदत मागितली. सासरच्यांनी त्या गरोदर महिलेच्या अंगावर रॉकेल ओतलं होतं. पोटातल्या बाळाचं लिंग कळल्यामुळे ते तिला पेटवून देण्याच्या तयारीत होते. सोनल आणि इतरांनी या महिलेला मदत केली. पण महिला सक्षमीकरणासाठी आपण आणखी काही तरी करायला हवं, याची जाणीव त्यांना झाली. ग्रामीण भागातल्या महिलांच्या परिस्थितीबाबत त्यांनी संशोधन केलं. मर्यादित स्रोतांमुळे या महिला मागे पडत असल्याचं त्यांच्या लक्षात आलं.



सोनल यांच्या कार्याचं बीज तिथेच रोवलं गेलं. मग जवळपास पाच वर्षांच्या प्रयत्नांनंतर नोकरी सोडून समाजकार्याकडे वळण्याचं धाडस सोनल यांनी दाखवलं. त्यांनी आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणाच्या कामाला वाहून घ्यायचं ठरवलं. काही काळ जागतिक बँकेसोबत काम केलं. विविध सामाजिक कार्यांसाठी देण्यात येणाऱ्या निधीच्या वाटपाचा अभ्यास केला. जागरूकतेच्या अभावामुळे ग्रामीण भागातल्या लोकांना सरकारी योजनांचे लाभ मिळत नसल्याची बाब त्यांच्या लक्षात आली. ग्रामीण भागातल्या महिला आणि मुलांसाठी असणाऱ्या सरकारी योजनांचे लाभ त्यांना मिळवून देण्यासाठी सोनल यांनी २०११ मध्ये शक्ती फाउंडेशन या सेवाभावी संस्थेची स्थापना केली.

सामाजिक परिस्थिती जाणून घेण्यासाठी त्या संपूर्ण गुजरात राज्यात फिरल्या. त्यानंतर त्यांनी सुरत आणि तापी परिसरातल्या हलपाती आणि कोटद्वारा या आदिवासी समाजांसाठी काम करायचं ठरवलं. या समाजांमधले पुरुष दारूच्या आहारी गेले होते. त्यामुळे त्यांचं आयुष्य खूप कमी झालं होतं तर वनसंपदा कमी झाल्यामुळे कोटद्वारा समाजाचा बांबूपासून हस्तकलेच्या वस्तू घडवण्याचा पारंपरिक व्यवसाय धोक्यात आला होता. त्यामुळे या दोन्ही समाजांची स्थिती अत्यंत हलाखीची होती. सोनल आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी बरेच प्रयत्न केले. शिक्षण, आरोग्य, स्वच्छता अशा विविध क्षेत्रांमध्ये काम केलं. आज तब्बल आठ वर्षांनंतर शक्ती फाउंडेशनने ५५ गावांमधल्या जवळपास पाच हजार आदिवासी महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केलं आहे. स्वत:चे व्यवसाय सुरू करण्यासाठी त्यांना संस्थेतर्फे प्रशिक्षण आणि मदत देण्यात आली आहे. आता त्याची गोड फळं चाखायला मिळत आहेत. आता संस्थेला आपलं कार्य राज्यभर पोहोचवायचं आहे. सोनल यांनी अनेक महिलांचं आयुष्य पूर्णपणे बदलून टाकलं आहे.

✦✦✦

## स्मार्ट टिप्स

### टाचांना भेगा आहेत?

टाचांना भेगा पडणं ही अनेकींची समस्या असते. मात्र वेळीच लक्ष दिलं नाही तर ही समस्या गंभीर रुप धारण करते. टाचांच्या भेगांमुळे स्किन इंफेक्शनचा धोका संभवतो. मधुमेहींना हा धोका अधिक गांभीर्यानं जाणव-तो. म्हणूनच यावर वेळीच उपाय करायला हवा. घरच्या घरी देखील टाचेच्या भेगांवर परिणामकारक उपाय होऊ शकतो. यासाठी बेकिंग सोडा आणि दूध हे मिश्रण वापरावं. दूध हे नैसर्गिक मॉइश्चरायझर आहे. दुधामुळे त्वचा मऊ मुलायम बनते. दुधाऐवजी मिल्क पावडरचाही वापर करता येतो. दोन कप दुधामध्ये एक चमचा बेकिंग पावडर मिसळावी आणि यात पाय बुडवून ठेवावेत. यामुळे पायाच्या भेगा कमी होतीलच त्याचप्रमाणे टॅनिंगही निघून जाईल.



## लक्षात असावे

### दरवळत रहा...

डिओचा सुगंध दिवसभर टिकवून ठेवायचा असेल तर काही टिप्स फॉलो कराव्या लागतील. ओल्या अंगावर डिओ फवारल्याने त्याचा सुगंध फार काळ टिकत नाही. त्यामुळे आंघोळीनंतर लगेच डिओ फवारू नका. अंग कोरडं करून मगच वापरा. ङ्मशेक बीफोर युजफ या सूचनेचं पालन करा. यामुळे डिओतले सर्व घटक एकजीव होऊन चांगल्या प्रकारे काम करतात आणि शरीराची जळजळ होत नाही. बाटली शरीरापासून १५ सेंटीमीटर लांब ठेऊन डिओ फवारा. डिओ कपड्यांवर फवारू नका.



## किचन टिप्स

### अशी चमकवा काळी भांडी

सततच्या वापरामुळे कढई आणि भांडी काळी पडतात. पदार्थ करपल्यामुळेही भांड्यांचा तळ काळपट दिसू लागतो. या काळ्या भांड्यांचा वापर नकोसा वाटतो. मात्र काही उपायांद्वारे तुम्ही भांड्यांचा काळपटपणा सहज दूर करू शकता. काळपट कढईत एक चमचा बेकिंग सोडा घालून त्यात दोन चमचे लिंबाचा रस आणि दोन कप पाणी घाला. स्टीलच्या स्क्रबरने कढई घासून स्वच्छ करा. काळपटपणा निघून जाईल. टोमॅटोच्या रसानेही काळपट भांडी स्वच्छ होतील. काळ्या पडलेल्या भांड्यांमध्ये टोमॅटोचा रस आणि पाणी घालून उकळून घ्या. यानंतर स्क्रबरने घासून स्वच्छ करा.



# फ्रीजमध्ये काय ठेऊ नये?

हेल्थ टॉक

बाजारातून आणलेल्या फळं, भाज्या आपण थेट फ्रीजमध्ये ठेवतो. यासोबतच घरातले उरलेसुरले पदार्थही फ्रीजमध्येच जातात. मात्र काही पदार्थ फ्रीजमध्ये ठेवल्याने त्यांची गुणवत्ता, चव बिघडते. शिवाय असे पदार्थ आरोग्यासाठीही घातक ठरू शकतात. कोणते पदार्थ फ्रीजमध्ये ठेवणं अयोग्य ठरतं? जाणून घेऊ.

✻ टोमॅटो फ्रीजमध्ये ठेऊ नयेत. त्यात पाणी कमी असल्यामुळे थंड वातावरणात ते लवकर खराब होतात. फ्रीजमधल्या टोमॅटोंचा रंगही बदलतो. अशा टोमॅटोंचं सेवन घातक ठरू शकतं.

✻ पाव, ब्रेड असे पदार्थ फ्रीजमध्ये ठेऊ नयेत. फ्रीजमध्ये ठेवल्यानंतर ब्रेड कोरडा पडतो. त्याची चव बदलते.

✻ फ्रीजमधल्या थंड वातावरणामुळे बटाट्यातल्या स्टार्चचं रुपांतर साखरेत होतं. यामुळे पोटाच्या समस्या निर्माण होतात.



✻ फ्रीजमधल्या मधात खडे तयार होतात. तसंच हे मध गोठून जातं. त्यामुळे मधाची बाटली सर्वसामान्य तापमानातच ठेवावी.

✻ थंडगार कलिंगड खूप छान लागतं. पण फ्रीजमध्ये ठेवल्यानंतर कलिंगडातले पोषक घटक नष्ट होतात.

✻ कॉफी फ्रीजमध्ये ठेऊ नये. यामुळे कॉफीचा ताजेपणा नष्ट होतो. कॉफी फ्रीजमधले विविध प्रकारचे गंध शोषून घेते. याचा आरोग्यावर परिणाम होतो.

✻ सोया सॉस, टोमॅटो केचप असे पदार्थ फ्रीजमध्ये ठेवण्याची गरज नसते.

✻ लिंबू, संत्र्यासारखी आंबट फळंही फ्रीजमध्ये खराब होतात. त्यांच्या सालांवर डाग पडतात आणि रसही आटतो.

✦✦✦

# रोज खा भात



डाएट मंत्रा

भारतामध्ये विविध खाद्यसंस्कृती अस्तित्वात असल्या तरी भात हा त्यातील समान धागा आहे. भारताच्या बहुतेक सर्व भागांमध्ये तांदळापासून बनवलेल्या विविध पाककृती आहाराचा बहुतांश भाग व्यापतात. एकंदरच भात हे भारतीयांचं आवडीचं अन्न आहे असं म्हणायला हवं. एकीकडे भातामुळे वजन वाढतं, जाडी वाढते, रक्तातील शर्करा वाढते असे समज भीती वाढवत राहतात. पण हे गैरसमजच असल्याचं तज्ज्ञ सांगतात. तांदळाच्या विविध जातींमध्ये व्हिटॅमिन्स आणि मिनरल्सचा उत्तम स्त्रोत असतो. तांदळामध्ये व्हिटॅमिन डी, कॅल्शियम, फायबर, थायमीन, लोह आदी आवश्यक घटकांची उत्तम मात्रा असते. म्हणूनच हे लाभ मिळवण्यासाठी दररोजच्या आहारात भात असावा.

पोट खराब असल्यास, जुलाब, उलट्या होत असल्यास तांदूळ आणि मुगाची डाळ एकत्र करुन तयार केलेली खिचडी खावी. ही खिचडी पचायला हलकी असते. त्याचप्रमाणे तांदळातील पौष्टिक घटकांमुळे पचनक्रिया सुरळीत होण्यास मदत होते.

✻ व्हाईट राईसऐवजी ब्राऊन राईसला प्राधान्य द्यावं. हा तांदूळ मधूमेहींसाठी विशेष उपकारक ठरतो. मात्र अस्थमा असणाऱ्यांनी हा तांदूळ वापरू नये. कारण या तांदळाची प्रकृती थंड आहे. या तांदळाचा भात खाल्ल्यास दम्याचा त्रास वाढू शकतो.

✻ दररोज भात खाल्ल्याने शरीराची कार्बोहाईड्रेटची गरज भागते. या घटकामुळे मेंदूचे कार्य सुरळीत रहाते. भातामुळे शरीराची कार्यक्षमताही टिकून राहाते.

✻ उच्च रक्तदाबाचा त्रास असणाऱ्या महिलांनी रोजच्या आहारात एक वाटी भात ठेवायलाच हवा. तांदळामध्ये सोडियमची मात्रा नसते. त्यामुळे हृदयविकाराचा धोका दूर रहातो.

✻ तांदळामध्ये नाममात्र स्वरूपात कोलेस्टेरॉल असतं. तुम्ही कोलेस्टेरॉल फ्री राईसही वापरू शकता. यामुळे जाडी वाढण्याचा धोका संपतो.

✻ ब्राऊन राईसमध्ये शरीरात विरघळणाऱ्या फायबरची पर्याप्त मात्रा असते. ही बाब कॅन्सरचा धोका दूर ठेवण्यास पूरक ठरते.

✻ भाताची पेजही लाभकारक आहे. इतकंच नव्हे तर, तांदूळ शिजवलेल्या पाण्याने चेहरा धुतल्यास त्वचारोग दूर होतात. त्याप्रमाणे सुरकुत्यांपासून मुक्ती मिळते.

✻ दररोजच्या आहारात भात असेल तर अल्झायमरचा धोका टळतो असं तज्ज्ञ सांगतात.

✦✦✦

# जपा केसांचे आरोग्य

थंडीत केसांची विशेष काळजी घ्यावी लागते. थंड वातावरण केस कोरडे होणं, त्वचा खाजणं, कोंड्याची समस्या वाढणं आदी त्रास संभवतो. म्हणूनच या दिवसात आहारात काही महत्त्वपूर्ण घटकांचा समावेश करुन केसांचं आरोग्य अबाधित राखण्याचा प्रयत्न करायला हवा.

थंडीत केसांच्या समस्या वाढतात हा अनेकींचा अनुभव असेल. म्हणूनच या दिवसांत केसांकडे विशेष लक्ष द्यायला हवं. केसगळती पर्यायाने सौंदर्याच्या हानी रोखायची असल्यास काही टिप्स लक्षात घ्यायला हव्या.



✻ केसांना प्रथिनं अत्यावश्यक असतात. ती पुरेशा प्रमाणात मिळाली नाहीत तर लोहाची कमतरता निर्माण होऊन केस गळू लागतात. म्हणून आहारात कडधान्ये, डाळी, मसूर, सोयाबीन, वाटाणे यांसारखे पदार्थ असावेत.

✻ दही, दूध, चीज यांचं पुरेसं प्रमाण असेल तर योग्य प्रमाणात कॅल्शियम आणि ड जीवनसत्त्व मिळून केसांची मुळं पक्की होतात.

✻ फळं आणि भाज्या, हिरव्या पालेभाज्या, पिवळ्या आणि नारिंगी रंगांची फळं यांमधून अ तसेच क जीवनसत्त्वं मिळून टाळूला तेलनिर्मिती करण्यास मदत होते.

✻ मीठ आणि साखर अति प्रमाणात खाल्लं जात असेल तर डोक्यावरची त्वचा लाल होऊन खाज सुटते. कोंडा वाढतो. म्हणून हे पदार्थ टाळले पाहिजेत.

✻ रोज थोडे काजू खाल्ल्याने जस्त मिळतं आणि त्यामुळे केस तेजस्वी दिसतात.

✻ गाजर, रताळी, अक्रोड, बदाम यांचा आहारातील समावेशही केसांच्या वाढीला उपयुक्त ठरतो.

✦✦✦

# चलती रंगीबेरंगी मस्काराची

ब्युटी टॉक

डोळ्यांचं सौंदर्य खुलवण्यासाठी काजळ, लायनर, आयशॅडो, मस्कारा यांचा वापर होतो. बोल्ड लूकसाठी रंगीबेरंगी मस्कारा ट्राय करता येतो. डोळ्यांच्या रंगानुसार त्याची निवड करा.

✻ काळ्यापेक्षा काही वेगळं ट्राय करायचं असेल तर ब्राउन मस्कारा लावा. ब्राउन मस्कारा तुम्हाला नॅचरल लूक देतो. हा मस्कारा पार्टी किंवा समारंभाला जाताना लावता येईल. ऑफिसमध्येही तुम्ही तो ट्राय करू शकता. ब्राउन रंगाचे डोळे असतील तर हा मस्कारा ट्राय करा. ✻ हिरवट रंगाचे डोळे असणाऱ्यांनी निळ्या रंगाचा मस्कारा लावायला हरकत नाही. निळ्या रंगातल्या विविध शेड्स ट्राय करता येतील. निळा रंग रात्रीपेक्षा सकाळी उठून दिसतो. हटके लूकसाठी गोल्डन मस्कारा ट्राय करा. ✻ डार्क ब्राउन रंगाच्या डोळ्यांसाठी मस्काराच्या हिरव्या शेड ट्राय करा.

✻ डोळ्यांचा आकार मोठा भासवायचा असेल तर पर्पल मस्कारा लावा. सावळ्या वर्णाच्या महिलांवर पर्पल तर गोर्या वर्णाच्या महिलांवर व्हायोलेट शेड उठून दिसेल.



✦✦✦

## स्पोर्ट्स मॅनियाचा सलग दुसरा विजय

पुणे : स्पोर्ट्स मॅनियाने डिसोझा एफएला ३-२ असे हरवून एआयएफएफ सब- ज्युनियर लीग २०२४-२५ मध्ये सलग दुसरा विजय नोंदवला. स्पोर्ट्स मॅनिया टर्फवर गुरुवारी दुसरा 'होम' सामना खेळणाऱ्या स्पोर्ट्स मॅनियाने डिसोझा एफएविरुद्ध सर्व आघाड्यांवर सातत्य राखले. त्याआधी, त्यांनी सलामीच्या सामन्यात रिलायन्स फाउंडेशन यंग चॅम्पसचा ४-० असा धुव्वा उडविला. कार्तिक जोशीच्या (२१') सुरुवातीच्या गोलमुळे स्पोर्ट्स मॅनियाने मध्यंतराला १-० अशी आघाडी घेतली. उत्तरार्धात, स्पोर्ट्स मॅनियाने अवघ्या ७ मिनिटांच्या फरकाने आणखी दोन गोलची भर घातली. शौर्य मोहोळ (५१') आणि गौतम चव्हाणने (५८') प्रत्येकी एक गोल करत एकूण आघाडी ३-० अशी वाढवली. ०- ३ अशा पिछाडीवर असताना प्रशिक्षक शुभम पासलकर यांनी २०१३ मध्ये जन्मलेल्या त्यांच्या पाच खेळाडूंना मैदानात उतरवण्याचा धाडसी निर्णय घेतला. जे नऊ मिनिटांसाठी एक वर्षाने लहान होते. त्यानंतर डिसोझा एफएने जोरदार प्रतिकार केला. हा निर्णय प्रामुख्याने तरुणांना खेळण्याची संधी देण्यासाठी होता. या बदलाचा परिणाम दिसून आला. तथापि, स्पोर्ट्स मॅनियाने सुरुवातीच्या आघाडीच्या जोरावर विजय मिळवला तरी शेवटच्या काही मिनिटांत त्यांना दोन गोल खावे लागले. कृष्ण शेट्टीच्या (६८' आणि ७०+३') दोन सुरेख गोलांमुळे डिसोझा एफएने एकूण फरक ३-२ असा कमी केला आणि स्पोर्ट्स मॅनियाने निसटत्या फरकाने बाजी मारली.

# कोल्ट्स, मस्कीटर्सचे विजय कायम

## पीवायसी विनसिस रॅकेट लीग २०२५ स्पर्धा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना क्लब आयोजित आठव्या पीवायसी विनसिस रॅकेट लीग स्पर्धेत कोल्ट्स, मस्कीटर्स या संघांनी आपली विजयी मालिका कायम ठेवत दुसरा विजय नोंदवला.

पीवायसी हिंदू जिमखाना क्लबच्या टेबल टेनिस, टेनिस व बॅडमिंटन कोर्टवर सुरु असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत कोल्ट्स संघाने रॉकेट्स संघाचा १५-०६ असा पराभव करून आपली विजयी सुरुवात कायम ठेवली. बॅडमिंटनमध्ये केदार नाडगोंडे, आर्य देवधर, अनिकेत सहस्रबुद्धे, अभिजीत राजवाडे, विमल हंसराज, चंद्रशेखर आपटे, रिआन करंदीकर, कर्णा मेहता, कुणाल शहा, वरद चितळे, क्षितिज कोतवाल, नकुल बेलवलकर यांच्या विजयी कामगिरीच्या जोरावर कोल्टस संघाने रॉकेट्स संघाचा ६-१ असा पराभव करून आघाडी घेतली. टेबल टेनिसमध्ये कौस्तुभ वाळिंबे, अतुल ठोंबरे, निखिल चितळे, समीर बेलवलकर, किरण खरे, मकरंद पाटणकर, समीर जालन, आरव श्रॉफ यांच्या सुरेख खेळीच्या जोरावर रॉकेट्स संघाने कोल्टस संघाचा ४-३ असा संघर्षपूर्ण पराभव करून हि आघाडी कमी करण्याचा प्रयत्न केला.

पण टेनिसमध्ये आर्यन सुतार, सार्थक प्रधान, संजीव घोलप, अथर्व अय्यर, ईशान भाले, यश शहा, श्रेया देशमुख, साकेत गोडबोले यांच्या खेळीच्या जोरावर कोल्टस संघाने रॉकेट्स संघाचा ६-१ असा पराभव करून संघाचा विजय सुकर केला.

दुसऱ्या लढतीत स्पिअर्स संघाने लॅन्सर्स संघाचा १३-०८ असा पराभव करून पहिला विजय मिळवला. बॅडमिंटन प्रकारात अर्जुन खानविलकर, गिरीश मुजुमदार, प्रशांत वैद्य, योहान खिंवसरा, अनिल देडगे, अनुज मेहता, कपिल बाफना, समीर सावळा, मनिष शहा, वेदांत खटोड यांच्या विजयी खेळीच्या जोरावर स्पिअर्स संघाने लॅन्सर्सचा ५-२ असा पराभव करून सुरेख सुरुवात केली.

टेबल टेनिसमध्ये शिल्पा पांडे, अनुज मेहता, हर्षद जोगाईकर, राजवीर बोरावके, आरिन माळी, मनिष शहा, राधिका इंगळहळीकर, समीर सावळा, सोहम जोशी यांच्या सुरेख खेळीच्या जोरावर स्पिअर्स संघाने लॅन्सर्स संघाचा ५-२ असा पराभव करून विजयी आघाडी घेतली. अखेरच्या टेनिस प्रकारात स्पिअर्स संघाला लॅन्सर्स संघाने ३-४ असे पराभूत केले.

अन्य चुरशीच्या लढतीत मस्कीटर्स संघाने तलवार्स संघाचा ११-१० असा निसटता पराभव करून दुसरा विजय मिळवला.

बॅडमिंटनमध्ये अनिश राणे, प्रतीक धर्माधिकारी, तन्मय चोभे, विक्रांत पाटील, यश काळे, आरुषी पांडे, यश मेहेंदळे, विश्वास मोकाशी यांच्या उत्कृष्ट खेळीच्या जोरावर तलवार्स संघाने मस्कीटर्स संघाचा ४-३ असा पराभव केला. टेबल टेनिसमध्ये शिरीष कर्णिक, राहुल पाठक, पराग चोपडा, नितीन पेंडसे, नितीन कोनकर, जया पाटणकर, संदीप साठे, प्रदीप जोशी, अनिल कुलकर्णी, रोहित कर्णिक यांच्या अफलातून खेळीच्या जोरावर मस्कीटर्स संघाने तलवार्स संघाचा ५-२ असा पराभव करून आघाडी घेतली. टेनिसमध्ये तलवार्स संघाने मस्कीटर्स संघाचा ४-३ असा पराभव केला. पण एक गुणांच्या फरकाने मस्कीटर्स संघाने विजय मिळवला.

## दगडुशेठ वॉरीयर्स, समर्थ चॅलेंजर, नुमवी स्टॅलियन्स्,
## रंगारी रॉयल्स्, नादब्रह्म सर्ववादक संघांची विजयी कामगिरी

**पुणे :** पुनित बालन ग्रुप तर्फे आयोजित पुण्यातील गणपती मंडळ, नवरात्र मंडळ, ढोल-ताशा पथकांच्या संघांचा समावेश असलेल्या चौथ्या 'फ्रेंडशिप करंडक' क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत गजर सुपरनोव्हा, दगडुशेठ वॉरीयर्स, नुमवी स्टॅलियन्स्, रंगारी रॉयल्स्, महालक्ष्मी मॅव्हरीक्स्, विश्रामबाग नाईट्स, समर्थ चॅलेंजर आणि



नादब्रह्म सर्ववादक या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेत विजयी कामगिरी केली. सहकारनगर येथील ल.रा. शिंदे हायस्कूल येथील मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत निलेश एस. याने आणि गोलंदाजांनी केलेल्या अचूक कामगिरीमुळे रंगारी रॉयल्स् संघाने जोगेश्वरी जॅग्वॉर्स संघाचा १० गडी राखून सहज पराभव केला. शुभम बलकवडे याने केलेल्या ५९ धावांच्या जोरावर गजर सुपरनोव्हा संघाने एचएमटी टायगर संघाचा ८ गडी राखून सहज पराभव केला. कपिल राऊत याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे दगडुशेठ वॉरीयर्स संघाने नादब्रह्म ड्रमर्सचा ९ धावांनी पराभव केला. कपिल याने ६५ धावा केल्या आणि ५ धावांमध्ये ३ गडी बाद केले. योगेश खालगांवकर याने केलेल्या नाबाद ६१ धावांच्या जोरावर नुमवी स्टॅलियन्स् संघाने कसबा सुपरकिंग्ज् संघाचा ६९ धावांनी पराभव करून आगेकूच केली. विवेक जांभुळकर याने केलेल्या नाबाद ३६ धावा आणि गोलंदाजांच्या अचूक कामगिरीमुळे महालक्ष्मी मॅव्हरीक्स् संघाचा १० गडी राखून पराभव करत स्पर्धेत सलग दुसरा विजय मिळवला. आतिश गाडे याने केलेल्या नाबाद ८४ धावांमुळे विश्रामबाग नाईट्सने जर्नादन जाएंट्सचा ४ धावांनी पराभव केला. २३० धावांचा पाऊस पडलेल्या सामन्यामध्ये जर्नादन संघाकडून शुभम इंगळे याने सुद्धा एकहाती लढा देताना ८४ धावांची खेळी केली. स्वप्निल घाटे याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर नादब्रह्म सर्ववादक संघाने नादब्रह्म ड्रमर्सचा ८ गडी राखून सहज पराभव करून आगेकूच केली. मॅक परदेशी याने केलेल्या अचूक गोलंदाजी आणि सागर इंदुलकर याने फटकावलेल्या ५४ धावांच्या जोरावर समर्थ चॅलेंजर संघाने गरूड स्ट्रायकर्सचा ३३ धावांनी सहज पराभव केला.

# राज्यस्तरीय विविध क्रीडा स्पर्धेत पीसीपीचे घवघवीत यश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** इंटर इंजीनियरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट्स असोसिएशन इंटर झोनल (राज्यस्तरीय स्पर्धा) च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कॅरम स्पर्धेत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक (पीसीपी) मधील मुलांच्या संघाला उपविजेता क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. ही स्पर्धा ग्रामीण पॉलीटेक्निक नांदेड येथे घेण्यात आली होती. या स्पर्धेत प्रमोद वैद्य, प्रकाश सोनवणे, प्रसाद मोरे, सोहम गवळी व आदेश ठाकरे यांनी सहभाग घेतला होता.

समर्थ पॉलिटेक्निक, बेल्हे येथे झालेल्या अॅथलेटिक्स स्पर्धेत पीसीपीच्या दिनेश फड या विद्यार्थ्याने लांब उडी आणि तिहेरी उडी यामध्ये राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

राजगड पॉलिटेक्निक, भोर येथे ३ मार्च रोजी झालेल्या वेटलिफ्टिंग स्पर्धेत श्रेयस काकडे त्या विद्यार्थ्याने उपविजेतेपद पटकावले.

या स्पर्धांना प्राचार्य डॉ. विद्या बॅकोड, यशस्वी विद्यार्थी व संघ व्यवस्थापक प्रा. संपत ननवरे, राजू गायकवाड, मारुती गायकवाड, राहुल चव्हाण, अतुल सालवे, किशोर गव्हाणे, लक्ष्मी थरकुडे, क्रीडा समन्वयक सुनील जगताप आदी उपस्थित होते.

अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत १५० हुन अधिक खेळाडू सहभागी

**पुणे :** अनिकेत वाकणकर टेनिस अकादमी यांच्या वतीने व शेपिंग चॅम्पियन्स फाऊंडेशन पुणे यांच्या सहकार्याने आयोजित एमएसएलटीए अनिकेत वाकणकर टेनिस अकादमी पीएमडीटीए अखिल भारतीय मानांकन सुपर सिरीज 12 वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत राज्यभरातून 150 हुन अधिक खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला आहे. ही स्पर्धा 8 ते 14 मार्च 2025 या कालावधीत एनसीएल टेनिस सेंटर, पाषाण येथे पार पडणार आहे. स्पर्धेचे संचालक अनिकेत वाकणकर यांनी सांगितले कि, स्पर्धेत महाराष्ट्र, तेलंगणा, तामिळनाडू, कर्नाटक, गुजरात, मध्यप्रदेश या ठिकाणांहून 150 हुन अधिक खेळाडू झुंजणार आहेत. ही स्पर्धा 12वर्षाखालील मुले व मुलींच्या एकेरी गटात होणार आहे. स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या करंडक व प्रशस्तिपत्रक अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. स्पर्धेसाठी आयटीएफ व्हाईट बॅच रेफ्री वैशाली शेकटकर यांची निवड करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

